# ४. राजनय : (Diplomacy)

विविध राज्यातील परस्पर संबंधाना आंतराष्ट्रीय संबंधामध्ये अतिशय महत्व असते. राजनय म्हणजे असे तंत्र पध्दती की ज्यामागे एक राज्य विविध राज्यांशी संबंध स्थापन करीत असते. साधारण संबंधपासून ते दोन देशातील युध्द व शांतता संबंध प्रस्थापित करण्यापर्यंतच्या सर्व संबंधाचा समावेश होतो. राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे आणि त्यात वृध्दी करण्याचे महत्वाचे आणि प्रभावी साधन म्हणून राजनयाचे महत्व प्राचीन काळापासून सर्वांनीच मान्य केलेआहे. प्राचीन काळात राजकीय संघर्षात मध्यस्थांनी करण्याचे कार्य करणारा हर्मेस म्हणजे देवाचे दूत या नांवाने संबांधले जात असे.महाभारतामध्ये श्रीकृष्णाची शिष्टाई विफल झाल्यानंतर कौरव पांडवाच्या मध्ये भारतीय युध्दास सुरूवात झाली. निकोल्सन म्हणतो रानटी अवस्थेत सुध्दा दिवसभर चालणारे युध्द, जखमी व मृत सैनिकांना रणभूमीवरून हलविण्याची आवश्यकता भासल्यामुळे दोन टोळयांनी एकमेकांशी कोणत्यातरी प्रकारे बोलणी करून युध्द थांबवण्याचे कार्य केले असले पाहिजे. या घडामोडींचा संबंध राजनय या शब्दाशी आहे. राज्या राज्यातील संबंध निर्माण करणे, टिकवणे ही प्रक्रिया अंत्यत नाजुक आणि गुंतागुंतीची असते. ही प्रक्रिया पार पाडण्याचा व्यवहार म्हणजे राजनय होय. आधुनिक आंतराष्ट्रीय संबंधाचा पाया म्हणजे विविध राष्ट्रातील संघटीत संबंध होय. या संबंधाची निर्मिती राजनयातून केली जाते. स्थिर अशी आंतररष्ट्रीय व्यवस्था राजनयातून निर्माण होत असते. राष्ट्र शक्ती विकासामध्ये सर्वात महत्वाचे भर टाकणारे साधन म्हणून राजनयाकडे बघितले जाते. राष्ट्र शक्तीचे इतर घटक जणू कच्च्या मालाप्रमाणे असतात. या कच्च्या मालाला उत्तम राजनयाची साथ मिळाली तर त्याचा खऱ्या अर्थाने राष्ट्रविकासासाठी उपयोग होतो. उत्तम राजनयीक संबंधांतून राष्ट्राची उन्नती होते. लोकसंख्या, खनिजद्रव्ये, अन्न धान्ये, मनोबळ, लष्करी शक्ती यांनी परिपूर्ण असणाऱ्या राष्ट्राला जर उत्तम राजनयिक नेतृत्व नाही लाभले तर ही सर्व घटके निरूपयोगी सिध्द होतात. राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाची उदिष्ट साध्य करण्याचे प्रभावी साधन म्हणून राजनया कडे पाहिजे जाते. राज्या राज्यातील संबंधाबाबत युध्द टाळण्याचा प्रयत्न राजनयाद्वारे केला जातो. केवळ युध्द सुरू होण्यापूर्वीच नव्हे तर युध्दाला आंरभ झाल्यानंतर देखील राजनयाची गरज भासतेच. एकंदरीत शांततेसाठी, युध्द यशस्वीपणे चालू ठेवण्यासाठी आणि युध्द समाप्त झाल्यानंतरही राजनयाची गरज असते. यामुळेच आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकरणात राजनयाचे अतिशय महत्व तर वाढलेच पण त्याच बरोबर त्याला कायम स्वरूपही प्राप्त झाले आहे.

## अर्थ व स्वरूप :

या इंग्रजी शब्दाचा मराठीतील समानार्थी शब्द म्हणून राजनय या शब्दाचा वापर केला जातो. डिप्लोमसी या इंग्रजी शब्दाचा अर्थ म्हणजे कूटनिती किंवा कुटीलनीती असा अर्थ काढण्याची पंरपरा

आपणाकडे आहे. कौटिल्याने अर्थशास्त्र या प्रसिध्द ग्रंथामध्ये शत्रूचा निःपात करण्यासाठी राजाने नीती अनीतीच्या कल्पनेत स्वतःला न गुंतवता करावयाच्या कृतींचे विवेचन केलेले आहेत. म्हणून नीतिविरहित राजकीय वृत्तांचा निर्देश करण्यासाठी व्यवहारामध्ये कुटीलनिती या शब्दाचा वापर केला जातो. मात्र अगदी तंतोतंत याच अर्थाने 'डिप्लोमसी' या शब्दाचा वापर या ठिकाणी केलेला नसून, दोन राज्यात संबंध प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने होणाऱ्या व्यवहारासाठी हा शब्द वापरलेला आहे. आज दोन राष्ट्रातील राजकीय व्यवहार हा परस्पर सद्भावनेवर आधारित असल्याने या ठिकाणी कुटनिती किंवा कुटीलनीती हा शब्द योग्य नसून राजनय हाच उचित आणि परिपूर्ण मानला जातो.

**व्याख्या :**

स्थूल मानाने राजनयाचा अर्थ वरील प्रमाणे असले तरी त्याचा सुसंबध्द अर्थ खालील व्याख्यांच्या स्वरूपात स्पष्ट करता येईल.

राजनय या संकल्पनेच्या अर्थाशी निगडीत अनेक पैलू पैकी एखादा विशिष्ट पैलू महत्वाचा आहे असे गृहित धरून विविध विचारवंतानी राजनयाच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यांना चार वर्गात विभाजित करून त्यांचे विश्लेषन पुढील प्रमाणे करता येईल.

**१) संबंध संचलन प्रक्रिया :** राजनय म्हणजे विविध राज्यामध्ये संबंध प्रस्थापित करणारी प्रक्रिया म्हणजे राजनय या अर्थाने राजनयाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

**पिटमन पिटर मते**, "राजनय या शब्दातून अशा साधनांचा व प्रथांचा उल्लेख होतो की, ज्या द्वारे प्रत्येक राष्ट्र आपल्या विविध प्रकारच्या प्रतिनिधींच्या माध्यमातून परस्परांच्या राजनैतीक संबंधाचे संचलन करीत असते."

राजनय म्हणजे विविध राज्यामध्ये संबंध निर्माण करण्याच्या उद्दशाने केला जाणारा केवळ तात्पुरता व्यवहार नसून ती सातत्याने चालणारी एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया व्यवहारामध्ये राजदूतांची नियुक्ती, त्यांचे स्वागत, त्यांची पदभ्रष्टता, प्रसंगी राजनयिक संबंधाची समाप्ती या साऱ्या बाबी प्रथा व परंपरेवर आधारीत असतात. एका राज्याद्वारे दुसऱ्या राज्यात नेमलेल्या राजदूताला सभ्यपणे वागवण्याची प्रथा निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशी प्रथा प्राचीन काळातही अस्तित्वात होती. सारांश विविध राज्यातील संबंधाचे संचालन करणारी प्रक्रिया, साधने व तंत्रे अशा स्वरूपाचा अतिशय व्यापक अर्थ वरील व्याख्येमधून सुचित होतो.

**२) राजनय ही एक कला** : राजनय ही एक कला समजून काही विचारवंतानी त्याची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे.

**क्विन्सी राईट** यांच्या मते, "किमान व्यय करून कमाल उदिष्ट साध्य करण्याच्या उद्देशाने वाटाघाटीत उपयोगात आणलेली कला म्हणजे राजनय."

**अर्नेस्ट स्टोव** यांच्या मते, "राज्या राज्याच्या शासनामध्ये परस्पर संबंध प्रस्थापित करण्यात बुध्दिमत्ता आणि कौशल्य यांचा वापर म्हणजे राजनय."

या वरील दोन्ही व्याख्या मध्ये प्रामुख्याने राजनय ही एक कला मानलेली आहे. राज्या राज्यात परस्पर संबंध प्रस्थापित करणे आणि ते टिकवणे ही एक अत्यंत नाजूक आणि गुंतागुंतीची प्रक्रिया

असते. ती कुशलतेने हाताळणे ही एक कला आहे. अन्य राज्यांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे व टिकवणे, युध्दामुळे आपले अहित होत असल्यास ते टाळून तडजोड करणे, राष्ट्रीय संबंधांना स्थैर्य प्राप्त करून देणे या सर्व घडामोडीं यशस्वी पणे घडवून आणण्यासाठी कौशल्य, चातुर्य, बुध्दीमत्ता ह्यांचा कलात्मक वापर करणे म्हणजेच राजनय होय. तेव्हा या व्याख्येमध्ये राजनय म्हणजे कला हा केंद्रबिंदू मानलेला आहे.

३) **राष्ट्रीय हित** : आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्राच्या वर्तनाचा प्रमुख आधार हा राष्ट्रहित असतो म्हणून राष्ट्रहितास प्राधान्य देवून काही विचारवंतानी राजनयची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे.

**हेन्स मॉर्गेन्थॉ** यांच्या मते, ''शांततापूर्ण मार्गाने राष्ट्रहिताची वृध्दी करणे म्हणजे राजनय.''
**के.एम. पण्णीकर** यांच्या मते, ''राजनय ही आंतरराष्ट्रीय संबंधात आपले राष्ट्रहित दुसऱ्या देशाच्या संदर्भात वापरण्याचे तंत्र होय.''

वरील दोन्ही व्याख्ये मध्ये राजनयाचा प्रमख उदेदश राष्ट्रहित मानलेलाअ ाहे. राष्ट्राचे संरक्षण आणि समर्थन करण्याच्या उदेशाने प्रत्येकराष्ट्र आंतरराष्ट्रीय पातळीवर कमाल मित्र किमान शत्रू आणि युध्द काळात उपद्रवी शक्तींना निष्क्रीय व तटस्थ ठेवण्याचा पयत्न करते. राष्ट्रहिताचे संरक्षण करून परराष्ट्र धोरण अमलात आणण्याचे प्रभावी साधन म्हणून राजनयाकडे या व्याख्येतून पाहिलेले आहे.

४) **संघर्ष नियंत्रणाचे साधन** : आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रसंगी राष्ट्रा राष्ट्रात तणाव निर्माण होवून संघर्षाला तोड फुटण्याची शक्यता असते. अशा वेळी यशस्वी राजनय करून संघर्ष टाळण्याचे व नियंत्रित करण्याचे प्रयत्न केले जाते. संघर्ष नियंत्रणाचा हा मुध्दा प्रमाण मानून राजनयाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

**हॅरॉल्ड निकोलसन** यांच्या मते, ''वाटाघाटीद्वारे आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्याची अशी पध्दती की जिच्या द्वारे राजदूत आणि प्रतिनिधी तसे संबंध जुळवितात आणि प्रस्थापित करतात.''

जगातील प्रत्येक राष्ट्र आपसात संबंध प्रस्थपित करण्यासाठी राजनयिक कृती किंवा व्यवहार करतात. आंतरराष्ट्रीय संघटनांच्या कृतीचे स्वरूपही अशाच प्रकारचे असते. तेव्हा हल्लीच्या सार्वभौम राष्ट्र राज्य पध्दतीत संघर्ष नियत्रंणाचे एक प्रभावी साधन म्हणून राजनया कडे बघितले जाते.

राजनयाच्या अशा प्रकारे विविध व्याख्या विविध विचारवंतानी केलेल्या आहेत. प्रत्येकांनी वेगवेगळ्या पैलूवर भर देवून आपली व्याख्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ऑक्सफोर्ड इंग्रजी शब्दकोषामध्ये दिलेला राजनयाचा अर्थ निकोलसनच्या व्याख्येतून ध्वनित होतो. या शब्दकोषामध्ये राजनयाचा जो अर्थ दिला आहे तो म्हणजे, ''राजनय म्हणजे वाटाघाटी करून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे किंवा राजनय म्हणजे अशी पध्दती की जिच्या द्वारे हे संबंध सोयीचे करून घेणे व त्याचे व्यवस्थापन करणे होय.''

वरील सर्व व्याख्या वरवर पाहिता राजनयाचा विविध अर्थ लावण्याच्या वाटत असल्या तरी वस्तूस्थिती तशी नाही. कारण या सर्व व्याख्या मध्ये राजनयाच्या अथ्रचे विविध पैलू स्पष्ट होत असल्याने त्यांचे महत्व नाकरता येत नाही. विविध व्याख्या मधून जो अर्थबोध होतो त्यावरून

राजनयाचे विवेचन करतांना पुढील गोष्टीचा अंतरभाव त्यामध्ये करावा लागेल. **एक** - दोन राष्ट्रात सोहार्द पूर्ण संबंध निर्माण करण्याची कला. **दोन** - परराष्ट्र धोरण अंमलात आणताना इतरांना न दुखवता राष्ट्रहित जोपासण्याचे साधन **तीन** - आंतरराष्ट्रीय सत्ता संघर्ष नियंत्रित करण्यचे साधन **चार**- प्राप्त परिस्थित युध्द टाळणे, तह किंवा करार घडवून आणणे, वाटा घाटीवर भर देवून राष्ट्राचे अहित टाळण्याचे साधन **पाच** - राष्ट्रा राष्ट्रामधील राजनय व्यवहारात वापरली जाणारी साधने, तंत्रे व व्यवहार यांच्याशी संबंधित प्रथा किंवा परंपरा म्हणजे राजनय

## राजनय आणि परराष्ट्र धोरण :

राजनय आणि परराष्ट्र धोरण यामध्ये फरक आहे. बऱ्याच वेळा डिप्लेमसी हा शब्द परराष्ट्र धोरण म्हणूनही वापरले जात असल्याने असा संभ्रम निर्माण होतो की राजनय व परराष्ट्र धोरण हे दोन्ही एकच आहेत की काय? प्रत्यक्षात या दोन परस्पर पूरक मात्र भिन्न बाबी आहेत. राजनय ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे देशाचे परराष्ट्र धोरण अंमलात आणले जाते. परराष्ट्र धोरण म्हणजे राजसत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावीत करण्यासाठी केलेली कृती म्हणजे परराष्ट्र धोरण होय. आणि राजनय म्हणजे आंतरराष्ट्रीय वाटाघाटीत किंवा व्यवहारात बुध्दीमत्ता आणि कौशल्याचा वापर करून आपले उदिष्ट साध्य करणे होय. म्हणजेच राजनय हे साध्य नसून साधन आहे. परराष्ट्र धोरण ज्या उदिष्टाने तयार केलेले असेल ते उदिष्ट साध्य करणारे एक प्रभावी साधन म्हणजे राजनय होय. परराष्ट्र धोरणात इतर रांज्याशी संबंध जोडण्या बाबत राष्ट्रीय हितावार आधारित काही सिध्दांत व धोरणांचा अंतर्भाव असतो. तौलनिक दृष्टया परराष्ट्र धोरणा पेक्षा राजनयाच्या सीमा मर्यादीत असतात. परराष्ट्र धोरण हा एक व्यापक विचार आहे. त्याचा मुख्य हेतून अनय राष्ट्राच्या संबंधाच्या दृष्टीकोनातून आपल्या राष्ट्राच्या गरजा व आकांक्षा यांचे संरक्षण करण्याचा असतो. परराष्ट्रात आपल्या राजनयिक प्रतिनिधीने पाठविलेला अहवाल व सूचना लक्षात घेऊन परराष्ट्र धोरणाची जडण घडण होत असते. याचाच अर्थ परराष्ट्र धोरणासंबंधी वाटाघाटी किंवा चर्चा करण्याचे राजनय हे एक साधन आहे. राजनयाची पध्दत परिस्थिती सापेक्ष बदलणारे असते. विशिष्ट उदिष्ट पूर्तीसाठी विविध राजनयिक पध्दतीचा उपयोग करावा लागतो. मात्र विदेशनीती एवढी लवचिक नसते हेरॉल्ड विल्सन यांनी परराष्ट्र धोरण आणी राजनय या दोन्हीतील फरक स्पष्ट करतांना म्हटले आहे की, राजनय हे परराष्ट्र धोरणाचे एक साधन किंवा पध्दत असते. राजनयाचा प्रयत्न चर्चा, वाटाघाटी, हितसंबंधाची देवाण घेवाण या मार्गाचा वापर करून राष्ट्रा राष्ट्रातील संघर्ष टाळण्याचा असतो. परराष्ट्र धारेणाचे उदिष्ट संघर्षा ऐवजी समझोत्याच्या मार्गाने साध्य करण्याचे प्रभावी साधन म्हणजे राजनय होय. तेव्हा राजनय शांततेचा मार्ग आहे. जेव्हा वाटाघाटी असफल होतात, तेव्हा राजनयाची प्रक्रिया थांबते आणि युध्दाला आरंभ होतो.

## राजनयाची उदिष्ट्ये

अन्य राष्ट्रें आणि त्याचे राजनयज्ञांच्या विचारवर आणि कार्यपध्दतीवर आपल्या राष्ट्राचे नियंत्रण निर्माण करणे हे राजनयाचे प्रमुख उदिष्ट असते. या पध्दतीने आपल्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाची उदिष्टये पूर्ण होवू शकतात. ज्या प्रकारे आपलयाविविध मागण्या इतर राष्ट्रावर लादता येतात त्याच प्रमाणे विविध अटींच्या आधारे अन्य राष्ट्राकडून सीमा सवलतीही प्राप्त करता येतात.

राजनयाचा मुख्य उद्देश राष्ट्राच्या हिताचे संरक्षण करणे आणि सवंर्धन करावयाचे असते. स्वतःची सुरक्षितता हा राज्याचा मुख्य उद्देश असतो. या संदीर्भात राजनयाची ठळक उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) राष्ट्रीय सत्तेच्या घटकांचा योग्य उपयोग :** विविध राष्ट्रामध्ये राष्ट्रीय सत्ता निर्माण करणारे विविध घटक असतात. मात्र या सर्व घटकांचा योग्य उपयोग नाही झाल्यास त्याचा राष्ट्राला काहींचा फायदा होत नाही तर उलट अडचण निर्माण होते. राष्ट्र सत्ता निर्माण करणाऱ्या विविध घटकांना राजनयाची जोड देवून राष्ट्राची सत्ता प्रभावी बनवता येते. कुशल राजनयीक या विविध घटकांचा उत्तम रीत्या उपयोग करून राष्ट्राची प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढवू शकतो. तेव्हा राजनयाचा एक उदेश म्हणजे राष्ट्रसत्ता निर्माण करणाऱ्या घटकांचा उचित वापर करून राष्ट्रांची प्रतिष्ठा वाढवणे.

**२) उत्तम आंतरराष्ट्रीय संबंधाची निर्मिती :** राजनय हे उत्कृष्ठ परराष्ट संबधं निर्माण करण्याचे प्रभावी साधन होय. आजच्या सार्वभौम राष्ट्र राज्यांच्या काळात अनेक आंतरराष्ट्रीय तणाव अधुन मधून नेहमी निर्माण होतात. अशा परिस्थितीत उत्तम आंतरराष्ट्रीय संबंध टिकवून ठेवणे हे राष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत जिकरीचे काम असते. अशा वेळी आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्यंत नाजूक व गुतांगुतीचे प्रश्न हितसंबंधाना धक्का न लावता हळूवार पणे सोडविण्याची जबाबदारी राजनयाची असते. इतर राष्ट्रांच्या भावंनाची कदर करून मतभेदाची दरी न रूदावता, संघर्ष व युध्दाचा अवलंब न करता, राष्ट्राचा अपेक्षित हेतू साध्य करणे हे राजनयाचे एक महत्वाचे उदिष्ट आहे.

**३) राष्ट्राचे संरक्षण आणि संवर्धन :** राजनयाचे तिसरे महत्वाचे उरिष्ट म्हणजे राष्ट्राचे संरक्षण आणि संवर्धन यांना हातभार लावणे. आजच्या सार्वभौम राष्ट्र राज्याच्या काळात राजनय ही प्रत्येक राज्याची मूलभूत गरज बनली आहे. कारण याच माध्यमाचा वापर करून राष्ट्राची प्रगती व विकास घडवून आणता येते आणि रक्तपाताशिवाय राष्ट्राचे संरक्षण साधता येते. प्राचीन काळी राजयनयाचा वापर केवळ उद्‌भवलेली युध्दे थांबवण्याकरीता होत होता. तेव्हा त्याचा उदेदश अत्यंत मर्यादीत होता. मात्र आज राजनयाचा उद्‌देश केवळ उद्‌भलेली युध्दे थांबवणे एवढेच नाहीतर, आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्याला हितकारक ठरणाऱ्या राष्ट्रांशी कायमचे संबंध प्रस्थापित करण्याचे सुध्दा आहे.

**४) परराष्ट्र धोरण राबवणे :** राजनयाचे आणखी एक महत्वाचे उदिष्ट म्हणजे परराष्ट्र धोरण राबवणे. कारण आजच्या काळात राजनय हे परराष्ट्र धोरण राबवण्याचे एक उत्तम साधन म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता पावलेले आहे. या अर्थाने राजनयाचा एक महत्वाचा उदिष्ट बनतो तो हा की, राष्ट्रीय हितसंबंधाची सांगड आंतरराष्ट्रीय हितसंबंधाशी घालणे .

**५) आंतरराष्ट्रीय संघर्ष टाळणे :** आजच्या राष्ट्र राज्याच्या काळात सार्वभौम राष्ट्रातील आपसातील मतभेद दूर करण्यासाठी युध्दासारख्या विनाशक मार्गाचा अवलंब न करता चर्चा, वाटाघाटी, हितसंबंधाची देवाण - घेवाण विचाराचे आदान-प्रदान या सारख्या शांततापूर्ण मार्गाचा अवलंब करणे हे राजनयाचे उदिष्ट आहे. अशा प्रयत्नात जेव्हा राजनय अपयशी ठरते तेव्हा युध्दे उद्‌भवतात. युध्दकाळात देखील शांतता किंवा युध्दबंदी, तह, करार, करण्यासाठी राजनय प्रयत्नशील असते.

आपल्या बाजूचे समर्थन करणाऱ्या मित्र राष्ट्रांना एकत्र आणणे, शत्रूंना त्यांच्या मित्रापासून एकाकी पाडणे किंवा तटस्थ ठेवणे यासारखे कार्य राजनयाचे चालूच असते. सारांश राष्ट्रा राष्ट्रातील समस्या शांतता मय मार्गाने सोडविण्याचे उदिष्ट ठेवून राजनयाला काम करावे लागते.

**६) राष्ट्रहित** : राजनयाचे आणखी एक महत्वाचे उदिष्ट म्हणजे राष्ट्रहित साधणे. आंतरराष्ट्रीय संबंधाची उभारणी करीत असताना राजनयाला आपल्या अंगची बुध्दीमत्ता आणि कौशल्याचा वापर करुन किमान हानी आणि कमाल राष्ट्रीय हित साध्य करावे लागते. कारण या सदंर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर एकप्रकारची स्पर्धाच चालू असल्याने आपल्या विरूध्द इतर राष्ट्रेएकत्र येवून गट करून काही कट करणार नाहीत याची काळजी राजनयाला घ्यावी लागते. युध्द काळात आपली बाजू कशी योग्य आहे हे अन्य राष्ट्रांना विविध तर्काच्या आधारे पटवून देवून युध्दासाठी आपला कसा नाईलाज झाला हे सांगावे लागते.

राजनयाची ठळक उदिष्टे म्हणून वरील बाबींचा उल्लेख करता येईल. या शिवाय राष्ट्राच्या आर्थिक व व्यापारी हितसंबंधांची वृध्दी करणे, नवीन बाजारपेठा शोधणे, खनिजद्रव्यांचा शोध घेऊन त्या हस्तगत करणे, नवीन तंत्रज्ञान हस्तगत करणे, यंत्रसामुग्री व प्रसंगी संपत्ती इतर राष्ट्राकडून प्राप्त करणे या सर्व बाबींचा समावेश राजनयाच्या उदिष्टा मध्ये करता येईल.

## राजनयची कार्य

राजनयाची कार्ये पार पाडणाऱ्यांना राजनयज्ञ असे म्हणतात. आजच्या सार्वभौम राष्ट्र राज्याच्या काळात प्रत्येक राष्ट्राला इतर राष्ट्राशी कायम स्वरूपी राजनयिक संबंध निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करावा लागतो. दोन राष्ट्रात तत्व आणि विचार प्रणालीच्या संदर्भात भिन्नता असू शकते. सांस्कृतिक मतभेद असू शकतता. या बाबीगृहित धरूनच जाणीवपूर्वक दोन्ही राष्ट्रात निकटचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. राजूदत किंवा राजनयज्ञ म्हणजे एखाद्या सरकाचे कान व डोळेच होत. आंतरराष्ट्रीय संबंध सुरळीत राखण्याच्या खडतर मार्गातील वाटाडे आणि मार्गदर्शक होत. जगातील राजकीय व्यवहाराची महत्वपूर्ण माहिती स्वतःच्या सरकारला पूरवून स्वतःच्या राष्ट्राचे हितसंबंध राजनयज्ञाला जोपासवे लागते. पामर आणि परकिन्स यांनी सांगितल्या प्रमाणे राजनयाचे मुख्य कार्य म्हणजे आपल्या राष्ट्राचे धोरण कार्यान्वित करणे, आपल्या राष्ट्राच्या आणि राष्ट्रातील जनतेच्या संरक्षणाची व्यवस्था करणे त्याच बरोबर आपल्या राष्ट्राच्या सरकारला जगातील महत्वाच्या घडामोडींची माहीती देणे होय. एंकदरीत राजनयज्ञ हे आंतर राष्ट्रीय व्यवहार सुलभ करतात सामान्यपणे राजनयज्ञाकडून पुढील महत्वाच्या कार्याची पूर्तता केली जाते.

**१) प्रतिनिधित्व** : प्रत्येक राष्ट्राच्या राजदूताचे किंवा राजनयज्ञाचे प्रमुख कार्य म्हणजे आपल्या राष्टाचे प्रतिनिधीत्व करणे. आपले राष्ट्र आणि ज्या राष्ट्रात त्याची नेमणूक झाली असेल ते राष्ट्र यांच्या मध्ये विचारांच्या आदान प्रदानाचे प्रमुख माध्यम म्हणजे राजनयज्ञ होय. प्रतिनिधीत्वाच्या संदर्भात राजनयज्ञाला तीन प्रकारची कार्ये करावी लागतात. **एक** - प्रतिकात्मक प्रतिनिधीत्व याचा अर्थ विविध प्रकारच्या समारंभात आपल्या देशाचे प्रतिकात्मक प्रतिनिधी या नात्याने सहभागी होणे. राष्ट्र प्रमुखांचे स्वागत करणे, त्यांची भेट घेणे. अशा वेळी प्रतिकात्मक प्रतिनिधीत्व करतो दुसरा- कायदेशीर प्रतिनिधीत्व. याचा अर्थ असा की, आंतरराष्ट्रीय परिषदा मध्ये राजनयज्ञ आपल्या राष्ट्राच्या वतीने

मतदान करतो. मतदान हे त्याचे कायदेशीर प्रतिनिधित्व होय. कारण राजनयाच्या कृतील कायदेशीर मुल्य असते. आणि तीन-राजकीय प्रतिनिधीत्व. जे की सर्वात महत्वाचे मानले जाते ते म्हणजे राष्ट्रीय धोरणा प्रामणे राष्ट्रीय हेतू साध्य करण्याच्या उदिष्टाने परदेशी नेत्यांच्या भेटीगाठी घेणे. आपल्या धोरणाला अनुकूल त्यांचे मत बनवणे कारण यातूनच देशाचे परराष्ट्र धोरण कार्यान्वीत होत असते.

राजनयज्ञ हा आपल्या राष्ट्रा बरोबरच राष्ट्रातील जनतेचेही प्रतिनिधीत्व करीत असतो. संबंधीत राज्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, महत्वाचे गट, अन्य सर्व क्षेत्रातील प्रमुख व्यक्तीशी राजनयज्ञाला संबंध प्रस्थापित करावे लागतात, परराष्ट्र कार्यालयातील आधिकारी वर्गाबरोबरच अन्य राष्ट्राचे राजदूत किंवा राजनयज्ञ, महत्वाच्या संघटनेचे नेत या सर्वांशी त्याला चांगले संबंध ठेवावे लागतात. राजदूत किंवा राजनयज्ञ हा मेहनती, संयमी, संभाषण चतूर व आपली छाप पाडणाऱ्या व्यक्तीमत्वाचा असावा लागतो. आपला देश व नागरिकांच्या प्रती स्वागत कर्त्यादेशात सद्‌भावना निर्माण करण्यात आणि मैत्री पूर्ण संबंध वाढवण्यात तो यशस्वी झाला पाहिजे. एखाद्या देशाची प्रतिष्ठा परदेशात वाढावणे हे राजनयज्ञाच्या कौशल्यावरच अवलंबून असते. आपल्या देशातील परराष्ट्र कार्यालये आणि बाहय जग यांच्यात संपर्क ठेवण्याचे कार्य राजनयज्ञ कडूनच पार पाडले जाते.

**२) वाटाघाटी** : वाटाघाटी याचा अर्थ प्रत्यक्ष भेटी, वैयक्तिक संपर्क आणि तडजोडीच्या मार्गाने समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न होय. राजनयज्ञाचे एक प्रमुख कार्य म्हणजे स्वागत कर्त्या देशातील शासनाशी विविध विषयांवर वाटाघाटी करणे. या कार्यामध्ये प्रामुख्याने द्विपक्षीय, बहुपक्षीय, सामजिक, राजकीय आर्थिक स्वरूपाचे करार, राजशिष्टचार आणि अन्य कागदपत्रे याचे मसूदे तयार करण्याच्या कार्याचा समावेश होतो. राजनयिक वाटाघाटीचे प्रमुख उद्देश म्हणजे युध्द टाळणे. बहुसख्ये राष्ट्रे युध्द टाळण्यासाठीच वाटाघाटी करीत असतात. वाटाघाटीच्या बोलणीतून चतुर राजनयज्ञाला शत्रूचे कच्चे दुवे, त्याच्या जवळील शक्ती, मनोबल, डावपेच, या सर्वाचा अंदाज येतो. यासाठी राजनय हा चतूर असला पाहिजे. आधुनिक काळात संसूचना आणि दळण वळण यामध्ये झालेल्या प्रंचड प्रगतीमुळे आणि अलिकडे बहुपक्षीय राजनयाच्या होणाऱ्या मोठया प्रमाणात उपयोगामुळे वाटाघाटीच्या प्रक्रियेत राजनयज्ञाला पूर्वी इतके महत्व राहीले नसून त्याचे कार्य खूपच मर्यादीत झाले आहे. दोन राष्ट्रातील प्रमुख बऱ्याच वेळा दुरध्वनीच्या सोयी मुळे परस्पराशी एकत्र ऐवून परस्परांशी प्रत्यक्ष संपर्क साधू शकतात. कराराच्या वेळी मंत्री किंवा राष्ट्रप्रमुख प्रत्यक्षरीत्या एकत्र येवून परस्परांशी संपर्क साधतात. अशा वेळी राजनयज्ञाला परराष्ट्र संबंध विभागाच्या सूचना व मार्गदर्शना प्रमाणे काम करावे लागते. असे असले तरी राजनयज्ञाला अनेक महत्वपूर्ण कार्ये करावीच लागतात. कुशल राजनयज्ञ स्वागत कर्त्या राष्ट्रांशी कार्यक्षेमतेने सौदेबाजी करून आपल्या राज्याचे हितसंबंध जोपासित असतो. प्रादेशिक बदल, परराष्ट्राची मदत, आयाता-निर्यात, विमान वहातूक, प्रवाशी दळण वळण वगैरे संदर्भात स्वागत कर्त्या राष्ट्रांशी आपल्या राज्याच्या वतीने राजनयज्ञ वाटाघाटी करीत असतात. वाटाघाटी मध्ये व्यक्तिगत गुंणांना जे महत्व आहे ते आजही कायम आहे.

**३) निवेदन सादर करणे :** राजनयाचे एक महत्वपूर्ण कार्य म्हणजे निवेदन सादर करणे. राजनयज्ञ हा यजमान राष्ट्रामधील स्वतःच्या राष्ट्राचे कान व डोळे या रूपात वावरत असतो. यजमान राष्ट्रातील सर्व बारीक सारीक घडामोडींचे तो सुक्ष्म अवलोकन करून त्यानुसार आपल्या देशातील धोरणांची दिशा कशी असावी या संदर्भात तो आपल्या देशांकडे निवेदन सादर करीत असतो. यजमान

राष्ट्रातील सद्याची अर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, शेती, संरक्षण या सर्व परिस्थितीचे प्रचलित परिस्थिती काय आहे याची माहिती निवदेनाद्वारे तो आपल्या देशाला कळवित असतो. या निवेदनाद्वारे राजनयज्ञ जी माहिती आपल्या देशाला पाठवतो त्याच्या आधारे त्याचा देश यमजान राष्ट्राबरोबर संबंध हितकारक होतील या पध्दतीने आपले परराष्ट्र धोरण निर्धारीत करीत असतो. मात्र प्रभावी परराष्ट्र धोरणाची निर्मिती तेव्हाच होवू शकते जेव्हा राजनयज्ञाचे पाठवलेले निवेदन हे वस्तूस्थितीवर आधारीत असतील परिस्थितीचा विपर्यास करणारे किंवा चुकीचे निदान करून पाठवलेल्या निवेदनावरील आधारीत एखाद्या परराष्ट्र धोरणामुळे राष्ट्रा राष्ट्रातील संबंधात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता मोठया प्रमाणात असते. या साठी राजनयज्ञ हा उत्तम निरिक्षक आणि सव्यसाची समतोल विचाराचा असणे आवश्यक असते. परराष्ट्र धोरण अचूक ठविण्याच्या बाबतीत एक मोलाचा मार्गदर्शक म्हणून राजनयज्ञाला अतिशय महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. शिवाय यजमान राष्ट्रातील दंगे, चळवळी, विचारप्रवाह, बाजारपेठांची स्थिती, जनक्षोभ या सारख्या घटकांचे आपल्या स्वतःच्या देशावर काय परिणाम होवू शकते याचे सुक्ष्म अवलोकन करून राजनयज्ञाला आपल्या देशाला निवेदन सादर करून जागृत करावे लागते.राष्ट्राकडे निवेदन पाठवण्यासाठी लागणारी आवश्यक ती माहिती राजनयज्ञ हा यजमान राष्ट्रातील परराष्ट्र मंत्रालय, वृत्तसंस्था, देशातील विविध व्यासपीठे, यामाध्यमातून गोळा करतो. ही माहिती गोळा करीत असतांना यजमान राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात त्याने हस्तक्षेप करता कामा नये . यजमान देशात व आपल्या स्वतःच्या देशात निरोगी व सदृढ वातावरण निर्माण होईल याच भूमिकेतून त्याला ही जबाबदारी पार पाडवी लागते. म्हणूनच राजदूत हा समतोल वृत्तीचा, चिकित्सक प्रवृत्तीचा , अचूक विश्लेषक आणि तत्पर हालचाली करणरा प्रसंगावधान राखणारा, काक दृष्टीचा असणे अत्यंत आवश्यक असते. त्याला आपल्या कार्याच्या गांभीर्याचे भान सतत ठवावे लागते. अचूक परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून कांही देशातील राजनयज्ञांची नांवे आजही घेतली जातात. उदा. अमेरिकेच हेन्री किसिजंर, केनिथ बी किटींग, भारताचे इंद्रकुमार गुजराल वगैरे.

**४) हितसंबंध जोपासणे :** यजमान राष्ट्रांच्या भावनाना धक्का न लावता आपल्या देशाच्या हितसंबंधाचे जो राजनयज्ञ जतन करतो तो उत्तम राजनयज्ञ म्हणवला जातो. कारण प्रत्येक राष्ट्राचे स्वतःचे असे हितसंबंध असतात आणि ते हिसतंबधं जपावे लागतात. आपल्या देशाच्या हितसंबंधांना अडथळा निर्माण होईल असे निर्णय यजमान देशातील शासनाने घेऊ नये या दृष्टीने प्रयत्न करणे राजनयज्ञाचे महत्वाचे कार्य आहे. यावर ही असे निर्णय घेतले गेल्यास त्या संबंधी आपल्या राष्ट्राला माहिती पुरवून सावध करणे ही त्याची जबबादारी असते. कुशल राजनयज्ञांच्या कामगिरी मुळे कित्येक राष्ट्रामधील वाद आणि तणाव दूर झाल्याची अनेक उदाहरणे आंतरराष्ट्रीय पातळीवर आहेत. ब्रिटनच्या राजपरिवारातील मध्यस्थीने फ्रान्स बरोबर बिघडलेले संबंध सुरळीत झाले. अमेरिका -चीन आणि अमेरिका भारत यांचे संबंध सुधारण्यात हेन्री किसीजंरची भूमिका अतिशय महत्वाची ठरली. राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासना करताना राजनयज्ञला त्याच्या कथणी आणि करणी यामध्ये अंतर पडले तरी त्याची फारशी काळजी त्याने करू नये. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात एके ठिकाणी म्हटले आहे की राजदूताने साम, दाम, दंड, भेद, यासर्व नीतींचा वापर करून राष्ट्रहित साध्य केले पाहिजे. राजदूताने राष्ट्रहिताची जोपासना, करताना नीती-अनीतीच्या कल्पना मध्ये स्वतःला गुरफटून घेऊ नये.

**५) युध्द वा संघर्ष :** प्रत्येक राष्ट्रातील राजनयज्ञ यजमान राष्ट्रात बावरत असताना त्याला

नेहमी एका गोष्टी बद्दल जागरूक राहावे लागते ते म्हणजे आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण करणे, यासाठी गरजेनुसार राजनयज्ञ युध्द टाळण्याचा प्रयत्न करतात. किंवा परिस्थितीची मागणीच असेल तर युध्द घडवून आणण्याचाही प्रयत्न करतात. तसे युध्दाचा पर्याय म्हणून राजयनज्ञाकडे पाहिले जात असले तरी काहीवेळा राजनय अपयशी ठरते आणि युध्दाला सुरूवात होते. आपल्या चातुर्याने आणि मुत्सदीने कुशल राजनयज्ञ युध्द टाळण्याचा प्रयत्न करतो. प्रसंगी स्वहिताच्या मागणी प्रमाणे त्याला शक्यता नसलेली युध्दे सुध्दा घडवून आणावी लागतात. जर्मनीच्या एकीकरणासाठी बिस्मार्कने ऑस्ट्रीयाशी युध्द घडवून आणले. याशिवाय अन्य देश या युध्दात ऑस्टीया -प्रशिया पासून अलग राहतील याचीही काळजी घेतली. १९७१ च्या बांगला प्रकरणात भारतीय राजनयांची भूमिका सुध्दा याच प्रकारची दिसून येते. तेव्हा राष्ट्रहिताला केंद्रबिंदू मानून राजनयज्ञाला युध्द घडवणे किंवा टाळणे यासाठी सतत प्रयत्नशील राहावे लागते.

**६) आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात सहकार्य** : प्रचलित आधुनिक काळात राजनयज्ञाचे कार्य हे बहुअंगी व बहुस्वरूपाचे बनलेले आहे. केवळ राजकीय स्वरूपाचे राजनय नव्हे तर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व अन्य बाबतीतही याची गरज आज प्रकर्षाने निर्माण झालेली आहे. कारण आज या सर्व संदर्भात जगातील विविध राष्ट्रामध्ये फार मोठी विविधता निर्माण झालेली आहे. तेव्हा या सर्व बाबतीत दोन देशात सहकार्य निर्माण करण्याच्या दृष्टीने राजनयज्ञाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागते. यजमान देशातील या सर्व क्षेत्रातील माहितीचे त्याला सखोल अध्ययन करून त्या प्रमाणे स्वतःच्या देशातील या क्षेत्रातील परिस्थिनुरूप कोणत्या प्रकारचे सहकार्य राष्ट्रहिताल उपकारक ठरू शकते, याचा विचार करावा लागतो. त्यासाठी आवश्यक त्या वातारणाची निर्मिती करावी लागते. आज जगातील कोणताही देश असा नाही तो सर्व बाबतीत स्वयंपूर्ण आहे. काही ना काही बाबतीत त्यांला इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. गरजांच्या बाबतीत असणारे परस्परारावलंबी राष्ट्रांचे स्वरूप लक्षात घेऊन त्याला पोषक वातावरणाची निर्मिती राजनयज्ञ करीत असतो. म्हणून या बाबतीत राजनयज्ञाच्या भूमिकेला आधुनिक काळात अतिशय महत्व प्राप्त झाले आहे.

**७) परदेशातील स्वकीय नागरिकांचे रक्षण** : दळण वळणाच्या विस्मयकारी प्रगतीमुळे आधुनिक काळात जग अतिशय जवळ आलेले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात प्राविण्य निर्माण करण्याची स्पर्धा संपूर्ण जगातच सुरू झालेली आहेत. व्यापार, शिक्षण, व्यवसाय, पर्यटन, या विविध कारणासाठी हजारो नागरिक परदेशी वास्तव्यासाठी जातात. अशा प्रसंगी त्यांच्या परदेशी वास्तव्याच्या काळात आपल्या देशातील नागरिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होवू नये. त्यांचे हक्क आणि स्वातंत्र्य सुरक्षित राहवे म्हणून त्यांना प्रवासविषयक परवाने, नागरिकायद्यांचे संरक्षण, योग्य त्या सवलती आणि योग्य ते संरक्षण मिळावे या दृष्टीने राजनयज्ञाला महत्वाची कामगिरी यजमान राष्ट्रात राहून पार पाडावे लागते.

**८) राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि अखंडत्वाची जपणूक** : राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करीत असतांना राजनयज्ञाला स्वार्थी वाटत असले तरी स्वतःच्या राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता यांची जपवणूक करावी लागते. पण्णिकरांच्या मते स्वदेशीच्या प्रादेशिक अखंडत्वाचे आणि राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे कोणत्याही परिस्थितीत राजनयज्ञाचे एक महत्वाचे कार्य आहे. यजमान राष्ट्राकडून आपल्या देशाच्या प्रादेशीक अखंडत्वास धोका पोचवण्याचा संभव असेल तर अशा

प्रसंगी स्वदेशातील शासनाला या संदर्भात सावध करून हा धोका टाळण्यासाठी मुत्सद्दीगरीने पावले टाकण्याची महत्वाची कामगिरी राजयज्ञाला पार पाडावी लागतात. यजमान राष्ट्रात आपले लेखण आणि वर्तन या माध्यमाचा वापर राजनयज्ञाला अशाच पध्दतीने करावे लागते की जेणे करून स्वतःच्या राष्ट्राचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडत्व अबाधित राहील.

**९) इतर कार्य :** राजनयज्ञाला वरील सर्व कार्ये तर पार पाडावीच लागतात. मात्र त्याच बरोबर अन्य काही भूमिकांही पार पाडाव्या लागतात. उदा. मित्रराष्ट्राबरोबर असलेले मैत्री पूर्ण संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने त्याला आवश्यक ती भूमिका पार पाडावी लागते. संकट काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रामाणिक मित्रांच्या सहकार्याला अतिशय महत्व असते. याची जाणीव ठेवून राजनयज्ञाला असलेल्या मैत्रीपूर्ण संबंधाना वरचेवर उजाळा देण्याचे प्रयत्न करावे लागतात. त्याच प्रमाणे जी शत्रू राष्ट्रे आहेत त्यांना स्वराष्ट्राच्या व्यवहारासंबंधात तटस्थ ठेवण्याची किंवा अलिप्त राखण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या डावपेंचाची आखणी करावी लागते. कारण आपल्या हितसंबंधाना फार मोठी अडसर निर्माण करण्याची शक्यता शत्रू राष्ट्राकडून असल्याने ते अलिप्त व तटस्थ राहणे फायद्याचे असते. आपल्या अर्थशास्त्र आणि द प्रिन्स या ग्रंथामधून कौटिल्य आणि मॅकिव्हली या कूटनितीज्ञांनी राजनयज्ञाच्या या कार्यावर बराच भर दिलेला आहे. शत्रूचा शत्रू हा आपला मित्र आणि मित्रांचा मित्र हा आपला मित्र ही या विचारवंताची दिलेली शिकवण आज आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राजनयज्ञ आपल्या आचरणात आणीत असतो. आधुनिक काळात राजनयज्ञाला आपल्या राष्ट्राचे व्यापारी हितसंबंधही जोपासवे लागतात. या हितसंबंधाची जोपासना करण्याच्या प्रयत्नातून आंतरराष्ट्रीय राजकारणात कांही नवीन शब्द उदयाला आले आहेत. उदा. ऑईल डिप्लोमसी, फुड डिप्लोमसी वगैरे.

एकंदरीत आधुनिक काळात राजनयज्ञाचे कार्य हे अनेकविध झालेले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे राजनयाचे क्षेत्रच मुळात अतिशय व्यापक बनले आहे.

## जुना राजनय व नवा राजनय :

राजनयाच्या इतिहासाचे अध्ययन सुलभ होण्याठी सर्व साधारणपणे राजनयाच्या विकासाच्या इतिहासाला तीन विभागात विभागता येते. प्राचीन काळापासून ते १८१५ च्या व्हिएन्ना कॉंग्रेस पर्यंतचा कालखंड हा प्राचीन राजनयच्या कालखंड म्हणून ओळखला जातो. १८१५ ते १९१९ म्हणजे व्हिएन्ना कॉंग्रेस ते पाहिले महायुध्द या कालखंडातील राजनयज्ञाला जुना राजनयाचा कालखंड असे म्हणतात. आणि १९१९ नंतरचा म्हणजे पहिल्या महायुध्दानंतरचा कालखंड म्हणजे नवीन राजनयाचा कालखंड होय. राज्य, विचार प्रणाली, राजनयात सहभागी होणाऱ्या व्यक्तिची संख्या, राजकीय व्यवहाराचे स्वरूप या विवधि घटकांना आधार मानून राजनयाचे विविध प्रकार पाडता येवू शकतात. या ठिकाणी प्रामुख्याने आपल्याला जुन्या आणि नव्या राजनया संबंधी विचार करावयाचा आहे.

## जुन्या राजनयाचा अर्थ व स्वरुप :

आपण वर पाहिल्या प्रमाणे व्हिएन्ना कॉंग्रेस ते पहिल्या महायुध्दा पर्यंतच्या काळात म्हणजेच १८१५ ते १९१९ या काळात जागतिक पातळीवर जे राजनय चालू होते त्याला जुन्या राजनयाचा काळ असे म्हणतात. सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासून ते १९१९ मध्ये पाहिले महायुध्द संपपर्यंत सुमारे

तब्बल तीन शतके जुना राजनय लोकप्रियच्या शिखरावर होते असे हेरॉल्ड निकोल्सनचे मत आहे. हा कालखंड आहे त्यामध्ये केवळ युरोप खंडातील राष्ट्रेच बलसंपन्न होती. या राष्ट्रांच्या वसाहतीत जगाच्या विविध भागात पसरलेल्या होत्या. या काळात वसाहत राष्ट्रांना स्वतंत्र असे अस्तित्व नव्हतेच. थोडक्यात या काळातील राजनय हे प्रामुख्याने युरोप पुरतेच मर्यादीत होते. या काळातील राजनयाचा प्रमुख उद्देश जसे थे परिस्थिती कायम राखून युरोप मध्ये शांतता प्रस्थापित करणे. वादग्रस्त प्रश्नांना संबधित राज्या पुरतेच मर्यादीत ठेवून शक्तीसंतुलन प्रस्थतिप करणे. या कालखंडातील दिग्गज राजनयज्ञ म्हणजे बिस्मार्क, काव्हूर, मॅटरनिक, टेलरॅड वगैरे होते. जुन्या काळातील राजनय बोलणी, वाटाघाटी, करार, तह हे सारे गुप्त ठेवण्यावर अधिक भर होता. सर्वत्र निरंकुश राजेशाही असल्याने जनतेला विश्वासात घेण्याची त्यांना गरज वाटत नव्हती. जुन्या राजनयज्ञाचा प्रमुख पाया म्हणजे राजघराण्याचे हितसंबंध सुरक्षित राखणे. युध्दासंबंधी असो की शांततेसंबंधी निर्णय राजाच घेत असे1 राज्या पेक्षा राजघराण्याच्या भोवतीच या काळात परराष्ट्र धोरण फिरत होते.

## जुन्याराजनय काळाची वैशिष्ट्ये :

जुन्या राजनयाचा संबंध ज्या काळाशी आहे त्या काळाची स्वतःची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. राजनय हे काळानुरूप घडणारी एक राजकीय प्रक्रिया या नात्याने जुन्या राजनयचे स्वरूप स्पष्ट होण्यसाठी त्या काळाची वैशिष्ट्ये विचारात घेणे आवश्यक आहे.

**१) वसाहत विस्ताराचाकाळ :** जुना राजनयाचा काळ म्हणजे हा वसाहतवादाचा काळ होय. या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींचा केंद्रबिंदू हा केवळ युरोपखंड होता. युरोप खंडातील प्रमुख राज्ये जगातील विविध खंडातील मागासलेल्या देशात आपल्या वसाहती निर्माण करण्यात दंग होते. जणू एक प्रकारे वसाहत निर्मितीची स्पर्धाच त्यांच्या मध्ये चालू होती. अशा परिस्थितीत जागतिक घडामोडी संबंधी प्रमुख निर्णय युरोपखंडातील हीच राज्ये घेत होती आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका या सारख्या मागास खंडातील राज्यांना निर्णय प्रक्रियेमध्ये कोणत्याच प्रकारचे महत्व नव्हते. युरोप मधील पाच बडया राष्ट्रांचा सहभाग ज्या क्षेत्रात असे त्याच क्षेत्रास जागतिक पातळीवर महत्व होते. त्यांचा सहभाग न झालेल्या युध्दांना देखील विशेष महत्व दिले जात नव्हते. मागास खंडातील प्रदेशाकडे वसाहती विस्ताराचे प्रदेश याच दृष्टीने पाहिले जात असे.

**२) लहान राज्यांना गौण महत्वाचा काळ :** आंतरराष्ट्रीय राजकारणांमध्ये आपल्या सामर्थ्याची आणि आपल्या महत्वाची जाणीव युरोपातील बडया राष्ट्रांना होती. आंतरराष्ट्रीय राजकारणातील अन्य देशांचे महत्व बडया राज्यांच्या राजकीय आणि डावपेचात्मक उपयुक्ततेवरुन निश्चित केले जात असे. युरोप खंडातील असो की मागासखंडातील असो लहान लहान आणि विखुरलेल्या राज्यांना विशेष महत्व या काळात नव्हतेच. मागासलेल्या पण लहान राज्यांचे हितसंबंध, त्यांच्या दृष्टीकोन यांना कसलेच महत्व नव्हते. या लहान राज्यामध्ये जर तणाव निर्माण झाला, तेथील शांतता जर धोक्यात आली तर ते सुरळीत करण्याचा मक्ता केवळ आपलाच आहे या अभिनिवेषाने युरोपातील बडी राज्ये त्यांच्या अंतर्गत कारभारात मुक्तपणे ढवळाढवळ करीत असत. त्यासाठी ही युरोपियन राज्ये परिषदा आयोजीत करीत असत. या परिषदा मध्ये पूर्ण पणे त्यांचे वर्चस्व असे. थोडक्यात या काळातील राजनय हे युरोपातील बडया राष्ट्राचे हितसंबंध तेवढे जोपासणारे होते.

३) **बहुतांशी राजेशाहीचा काळ** : जुन्या राजनयाचा जो कालखड आहे तो प्रामुख्याने कमी अधिक प्रमाणात सर्वत्र राजेशाहीचा काळ आहे. राज्य नव्हे तर राजा ही व्यक्ती सार्वभौम मानली जात असे. देशाच्या अंतर्गत आणि परराष्ट्र विषयक सर्वच क्षेत्रात राजा एकटा स्वतःच निर्णय घेत असे. एवढेच नव्हे तर प्रसंगी युध्द, तह, करार या बाबतीत निर्णय घेण्याचा संपूर्ण अधिकार राजाकडेच होते. या अधिकारांसंबंधी तो कोणालाच जबाबदार नसे. म्हणून प्रसंगी हे राजे असे निर्णय घेतांना लहरी आणि स्वार्थी निर्णय ही घेत असत.

## जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये :

जुना राजनय हा केवळ युरोप पुरताच मर्यादीत होता. सतरा, आठरा व एकोणीसाव्या शतकापर्यंत जगातील अनेक देश युरापातील बडया राष्टांच्या वसाहती बनल्या होत्या. अशा परिस्थितीत कांही लहान राष्ट्रे जी होती त्यांचा उपयोग ही बडी राष्ट्रे सत्ता संतुलनासाठी करीत असत. जुना राजयनय हा खुला नव्हता तर तो गुप्त पध्दतीचा होता. जुन्या राजनयाची कांही ठळक वैशिट्ये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **गुप्तता** : गुप्त राजनय हे जुन्या राजनयाचे एक ठळक लक्षण होय. राजेशाही मुळे इतर राज्यांशी केले जाणारे तह किंवा करार हे जनतेस विश्वासात घेवून करण्याची त्यांना आवश्यकता वाटत नव्हती. त्यामुळे जनतेत एक प्रकारचे सांशक वातावरण राहात असे. बडी राष्ट्रे जो काही करार करीत असत. त्या संदर्भात कमालिची गुप्तता पाळली जात असे. कराराशी संबंधीत राष्ट्रा व्यतिरिक्त अन्य कोणत्याच राष्ट्राला त्या करारातील तपशीलचा मागमुसही लागू दिला जात नसे. यातूनच राज्यकर्त्या विषयी अनेक गैरसमज त्या काळी निर्माण होत असत. राजा आणि प्रजा यांच्यात परस्पर भितीचे वातावरण तयार होत असे. शेजारी राष्ट्रे या गुप्त राजनयामुळे साशंक व सतत तणावाखाली वावरत असत. या परिस्थितीमुळे जागतिक पातळीवर अनेक संघर्ष निर्माण होत असत. पहिल्या महायुध्दाची जी अनेक कारणे आहेत त्यापैकी एक कारण गुप्त राजनय हे देखील आहे हे याच अर्थाने .

२) **जनतेच्या सहभागाचा अभाव** : जुन्या काळातील राजनयाचे दूसरे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे राजनयाच्या प्रक्रियेत सामान्य जनतेचा सहभाग अतिशय अभावनेच आढळायचा. मोकळेपणाने आपले मत राजनया संबंधी सामान्य माणसाला या काळात मांडता येत नसे आणि जरी कोणी मांडलेच तरी त्याची फारशी कोणी दखल घेत नसे. जनमताच्या पाठींब्या अभावी राजनयाप्रती जनतेचा सुर नाराजीचा तर असेच पण अविश्वासाचे देखील असे.

३) **जन शिक्षणांचा अभाव** : सर्व सामान्य जनतेचा जुना राजनयात सहभाग नसल्याने राजनयासाठी ज्या प्रशिक्षणाची गरज असते, त्याची उपलब्धी जुन्या राजनयिक काळात नव्हती. राजनय खुले आणि जनसामान्याना सहभागी करून घेवून घडणारी प्रक्रिया नसल्याने राज्या राज्यातील दोन्ही बाजू लोकांच्या पुढे येत नसे. वृत्तपत्रांना किमंतच नसल्याने विरोधी बाजू प्रकाशात येत नसे. या काळातील राज्ये आपल्या देशाची धोरणे, हितसंबंध, डावपेच, हे अन्य राष्ट्रांना कळू नये. याची खबरदारी घेत असल्याने अशा परिस्थितीत लोक शिक्षणास अजिबात वाव नव्हता.

४) **राजघराण्यांशी संबंधित** : जुन्या राजनयाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट म्हणजे या

राजनयामध्ये केवळ राजघराण्याची शिष्टजन मंडळी सहभागी होत असत. परिणामी राजनयाची प्रक्रिया अशा रीतीने घडवून आणीत असत की ज्यामुळे राजघराण्यातील व्यक्तिंच्या प्रतिष्ठेचे हिताचे आणि फायद्याचे संरक्षण होईल. वैयक्तिक व राजघराण्यातील हितसंबंध जपले जात असल्याने स्वाभाविकच राष्ट्रहिताला या राजनयात गौण स्थान दिले जात असे.

५) **अप्रशिक्षित राजनयज्ञ** : जुन्या राजनयाच्या काळात परदेशात पाठवले जाणरे राजनयज्ञ हे प्रशिक्षित नसत त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा विशेष असा अभ्यास सुध्दा नसे. त्यामुळे राजनयज्ञाच्या प्रक्रियेत नव्या काळात जी छाप राजनयज्ञांची पडते तशी छाप जुन्या काळातील राजनयज्ञाचे पडत नसे. केवळ राजघरांण्याशी संबंधीत व्यक्तींचा राजनयज्ञां मध्ये समावेश केला जात असल्याने त्याच्या पात्रतेला महत्व दिले जात नसे. शिवाय त्या काळात या प्रकारच्या प्रशिक्षणाची कोणतीच सोय व संकल्पना नव्हती.

६) **मर्यादीत स्वरूप** : जुन्या राजयनाचे स्वरूप अत्यंत मर्यादीत होते. कारण राजनयज्ञाच्या माध्यमातून बडी राष्ट्रे लहान लहान राज्यांचे हितसंबंध जोपासणे व त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारणे इतकेच मर्यादीत कार्य करीत असलत्यामुळे राजनयज्ञाचे क्षेत्र जुन्या काळी अतिशय मर्यादीत होते.

७) **युरोप हाच केंद्र बिंदू** : या जुन्या राजनयांचा संबंध प्रामुख्याने युरोप पुरताच मर्यादीत होता. त्यात इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, हेच देश या राजनयाचे केंद्रबिंदू होते. या राज्यांनी जगात अन्य मागास देशात आपल्या वसाहतींचा विस्तार केलेला होता. मागास देशातील या वसाहतीतून कच्या मालाची आयात करणे व पक्या मालासाठी हुकमी बाजार पेठा निर्माण करणे आणि आपल्या साम्राज्यवादाचा विस्तार करणे या हेतूंना पूरक एवढेच राजनयाचे कार्यक्षेत्र होते.

८) **प्रतिष्ठा निरपेक्षता** : जुन्या राजनयाच्या काळात दोन राज्यांच्या अंतर्गत निर्माण झालेले प्रश्न वा समस्या सोडवितांना तो प्रश्न प्रतिष्ठेचा न करता सामोपचाराने तडजोडीच्या मार्गाने कसे सोडविता येईल, याचा विचार केला जतो असे. जुन्या राजनयात ध्येयवाद राष्ट्रवाद, स्वार्थ या सारखे अभिनिवेष बाजूला सारून प्रश्न प्रतिष्ठेचा न मानत विचारांच्या देवाण घेवाणीतून प्रश्न कसा सोडवता येईल या संबंधी प्रयन्त केले जात असत. या राजनयामध्ये प्रामुख्याने युध्दाकडून शांतते कडे कसे जाता येईल याचाच विचार होत असे.

९) **राजनयज्ञांचे स्वातंत्र्य व लवचिकता** : जुन्या राजनयाच्या काळी दळण वळणांच्या साधनात आजच्या सारखी प्रगती झालेली नसल्याने परदेशातील राज्यकर्त्यांशी आणि परदेशातून आपल्या देशातील राज्यकर्त्यांशी संपर्क साधणे सहज शक्य नव्हते. त्यामुळे परिस्थितीनुरूप राजनयज्ञांना स्वतःच निर्णय घ्यावे लागत असे. वाटाघाटींचा तपशील ठरवण्यापासून ते तडजोडीसाठी कोणत्या गोष्टीचा आग्रह धरावयाचा व कोणत्या गोष्टी सोडून द्यायच्या या संदर्भात परिस्थिती सापेक्ष निर्णय घेण्यास राजनयज्ञ स्वतंत्र होते. परिणामी राजनयातील वाटाघाटी आणि तडजोडी या कामी आवश्यक असणारी लवचिकता त्यांच्या व्यवहारामध्ये आणि कार्य करण्याच्या पध्दतीमध्ये मोठया प्रमाणावर होती.

## जुना राजनय मागे पडण्याची कारणे :

१९१९ नंतर म्हणजे पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर जागतिक परिस्थिती झपाटयाने

बदलली. अनेक देशातील राज्यशाहीच्या जागा लोकशाही शासनपध्दतीनं घेतल्या. पारतंत्र्यानंतर राष्ट्र एकामागून एक स्वतंत्र्य होवू लागली. जनतंप्रती जबाबदार शासन पध्दती अस्तित्वात येवू लागल्या. उदारमतवादी लोकशाही शासनाकडून लोकांच्या अपेक्षा उंचावल्या. जनसामान्यांना असे वाटू लागले की जागतिक व्यवस्थेतील सर्व दोष लोकशाहीच्या उदयाने आपोआप नाहीसे होतील. लोकशाही करणाची प्रक्रिया आंतरराष्ट्रीय व्यवहारात सुध्दा आणले जावे अशी मागणी होवू लागली आणि नेमके याच मुळे अस्तित्वात असलेल्या जुना राजनय मागे पडून नव्या राजनयाच्या उदयाला आरंभ झाला. एकंदरीत ही बदलेली अवस्थाच जुन्या राजनयाला मागे टाकण्याचे काम केले. ढोबळ मानाने जुना राजनय मागे पडण्याची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) लोकशाहीचा उदय** : आंतरराष्ट्रीय ताण तणावाचे, संघर्षाचे आणि मतभेदाचे एक प्रमुख कारण म्हणजे राज्यशाहीतील एकंतत्री कारभार आहे याची खात्री पहिल्या महायुध्दानंतर जगातील राजकीय मुत्सदी आणि विचारवंताची झाली. कारण राज्येशाहीत राजे हे कोणालाच जबबादार राहात नसल्याने त्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कारभार लहरी प्रमाणे ते करीत. जनतंप्रती जबबदार शासन पध्दतीत राजांच्या या लहरी कारभाराला आळा बसतो. परिणामी आंतरराष्ट्रीय ताण तणाव कमी होवून बरीच अरिष्ट्ये टाळू शकतो याची खात्री पटली. अत्याधुनिक विध्वसंक शस्त्रांच्या शोधामुळे युध्द अत्यंत हानिकारक सिध्द होवू लागली शिवाय पहिल्या महायुध्दांच्या अनुभवाने युध्दाची भयानकता लक्षात आल्याने युध्दाप्रती जनमाणसात भीति व तिरस्काराची भावना निर्माण झाली. या युध्दास कारणीभूत असणारे राज्यकर्ते जनमानसाच्या नजरेतून उतरले. परिणामी लोकशाही शासन पध्दतीची लोकप्रियता वाढली व राजेशाही जुगारून युरोपात कित्येक राज्यात लोकशाही शासन पध्दतींचा अवलंब सुरू झाला. लोकशाहीच्या उदयाने ज्या प्रमुख गोष्टी घडून आल्या त्या म्हणजे निष्ठांच्या दिशा बदलल्या आपल्या राजा ऐवजी राष्ट्रप्रती निष्ठा एकवटल्या, योजनांचे प्राधान्य क्रम बदलून राजा ऐवजी जनसामान्यांचे कल्याण पुढे आले. बेजबाबदार राज्यकर्त्यांना आपल्या कृत्याप्रती जबाबदारीची जाणीव ठेवून व्यवहार करणे भाग पडू लागले. शासनाच्या स्वच्छंदी व लहरी कार्यक्रमावर नियंत्रणे आली. त्याच बरोबर राजनयिकांच्या स्वतंत्र्याला ही पूर्वीच्या तुलनेत मर्यादा पडल्या. तेव्हा लोकशाहीच्या उदयामुळे जुन्या राजनयाच्या काळातील परिस्थितीत आमुलाग्र बदल जो घडून आला त्यामुळे जुना राजनय मागे पडला आणि नवीन परिस्थिती आणि नवीन संदर्भात नव्या राजनय पध्दतीच्या विचारांना सुरूवात झाली.

**२) लोकमताचा प्रभाव** : लोकशाही शासनामध्ये एक गोष्ट अगदी स्वाभाविक पणे घडते ते म्हणजे देशाच्या अतंर्गत आणि परराष्ट्र धोरणांवर देशातील जनतेच्या मतांचा प्रभाव हा अपरिहार्यपणे पडतो. ज्या धोरणांशी जनमत संमत नाही त्या धोरणांचा स्वीकार राज्यकर्त्यांना सहसा करता येत नाही. म्हणूनच सरकारला आपल्या धोरणांची माहिती जनतेपूढे ठेवावी लागते. जनतेला विश्वासात घ्यावे लागते. आणि नंतरच त्या धोरणाची अंमलबजावणी करावी लागते. मग हे धोरण देशांतर्गत असो की परराष्ट्रा संबंधी. त्यामुळे आपोआपच जुन्या राजनयाचे जे एक महत्वाचे वैशिष्टये आहे ते म्हणजे गुप्तता ही शिल्लक राहू शकत नाही. जनमताच्या रेटयामुळे शासनाला आपले राजनयिक व्यवहार जुन्या काळाप्रमाणे लवचिक ठेवता येत नाही तर त्याबाबतीत त्यांना ताठर भूमिका घेणे भाग पडते. लोकशाही व्यवस्थेतील राजनयज्ञ आपली नीति केवळ परराष्ट्रातील शासनांना पटवून देणे पुरेसे नसते

घेतल्या. पारतंत्र्यानंतर राष्ट्रे बदलली. अनेक देशातील राज्यशाहीच्या जागा लोकशाही शासनपध्दतीने घेतल्या. पारतंत्र्यानंतर राष्ट्र एकामागून एक स्वतंत्र्य होवू लागली. जनतेप्रती जबाबदार शासन पध्दती अस्तित्वात येवू लागल्या. उदारमतवादी लोकशाही शासनाकडून लोकांच्या अपेक्षा उंचावल्या. जनसामान्यांना असे वाटू लागले की जागतिक व्यवस्थेतील सर्व दोष लोकशाहीच्या उदयाने आपोआप नाहीसे होतील. लोकशाही करणाची प्रक्रिया आंतरराष्ट्रीय व्यवहारात सुध्दा आणले जावे अशी मागणी होवू लागली आणि नेमके याच मुळे अस्तित्वात असलेल्या जुना राजनय मागे पडून नव्या राजनयाच्या उदयाला आरंभ झाला. एकंदरीत ही बदलेली अवस्थाच जुन्या राजनयाला मागे टाकण्याचे काम केले. ढोबळ मानाने जुना राजनय मागे पडण्याची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) लोकशाहीचा उदय** : आंतरराष्ट्रीय ताण तणावाचे, संघर्षाचे आणि मतभेदाचे एक प्रमुख कारण म्हणजे राज्यशाहीतील एकतंत्री कारभार आहे याची खात्री पहिल्या महायुध्दानंतर जगातील राजकीय मुत्सदी आणि विचारवंताची झाली. कारण राज्येशाहीत राजे हे कोणालाच जबबादार राहात नसल्याने त्यांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कारभार लहरी प्रमाणे ते करीत. जनतेप्रती जबाबदार शासन पध्दतीत राजांच्या या लहरी कारभाराला आळा बसतो. परिणामी आंतरराष्ट्रीय ताण तणाव कमी होवून बरीच अरिष्टे टाळू शकतो याची खात्री पटली. अत्याधुनिक विध्वसंक शस्त्रांच्या शोधामुळे युध्दे अत्यंत हानिकारक सिध्द होवू लागली शिवाय पहिल्या महायुध्दांच्या अनुभवाने युध्दाची भयानकता लक्षात आल्याने युध्दाप्रती जनमाणसात भीति व तिरस्काराची भावना निर्माण झाली. या युध्दास कारणीभूत असणारे राज्यकर्ते जनमानसाच्या नजरेतून उतरले. परिणामी लोकशाही शासन पध्दतीची लोकप्रियता वाढली व राजशाही जुगारून युरोपात कित्येक राज्यात लोकशाही शासन पध्दतींचा अवलंब सुरू झाला. लोकशाहीच्या उदयाने ज्या प्रमुख गोष्टी घडून आल्या त्या म्हणजे निष्ठांच्या दिशा बदलल्या आपल्या राजा ऐवजी राष्ट्रप्रती निष्ठा एकवटल्या, योजनांचे प्राधान्य क्रम बदलून राजा ऐवजी जनसामान्यांचे कल्याण पुढे आले. बेजबाबदार राज्यकर्त्यांना आपल्या कृत्याप्रती जबाबदारीची जाणीव ठेवून व्यवहार करणे भाग पडू लागले. शासनाच्या स्वच्छंदी व लहरी कार्यक्रमावर नियंत्रणे आली. त्याच बरोबर राजनयिकांच्या स्वतंत्र्याला ही पूर्वीच्या तुलनेत मर्यादा पडल्या. तेव्हा लोकशाहीच्या उदयामुळे जुन्या राजनयाच्या काळातील परिस्थितीत आमुलाग्र बदल जो घडून आला त्यामुळे जुना राजनय मागे पडला आणि नवीन परिस्थिती आणि नवीन संदर्भात नव्या राजनय पध्दतीच्या विचारांना सुरूवात झाली.

**२) लोकमताचा प्रभाव** : लोकशाही शासनामध्ये एक गोष्ट अगदी स्वाभाविक पणे घडते ते म्हणजे देशाच्या अतंर्गत आणि परराष्ट्र धोरणावर देशातील जनतेच्या मतांचा प्रभाव हा अपरिहार्यपणे पडतो. ज्या धोरणांशी जनमत संमत नाही त्या धोरणांचा स्वीकार राज्यकर्त्यांना सहसा करता येत नाही. म्हणूनच सरकारला आपल्या धोरणांची माहिती जनतेपुढे ठेवावी लागते. जनतेला विश्वासात घ्यावे लागते. आणि नंतरच त्या धोरणाची अंमलबजावणी करावी लागते. मग हे धोरण देशांतर्गत असो की परराष्ट्रा संबंधी. त्यामुळे आपोआपच जुन्या राजनयाचे जे एक महत्वाचे वैशिष्ट्ये आहे ते म्हणजे गुप्तता ही शिल्लक राहू शकत नाही. जनमताच्या रेटयामुळे शासनाला आपले राजनयिक व्यवहार जुन्या काळाप्रमाणे लवचिक ठेवता येत नाही तर त्याबाबतीत त्यांना ताठर भूमिका घेणे भाग पडते. लोकशाही व्यवस्थेतील राजनयज्ञ आपली नीति केवळ परराष्ट्रातील शासनांना पटवून देणे पुरेसे नसते

तर परदेशातील जनतेचाही त्या संदर्भात विश्वास प्राप्त करावा लागतो. कारण परदेशातील जनतेला एकदा का आपली नीती पटली की ते आपल्या देशातील शासनावंर दबाब निर्माण करून त्यांचा स्वीकार करण्याची सक्ती करू शकतात. यातूनच देशातील आणि देशाबाहेरील जनमत आपल्या नितीप्रती आकर्षित करून घेण्यासाठी मग विविध प्रचार तंत्राचा वापर मोठया प्रमाणात होवू लागला. परिणामी जुना राजनय मागे पडला.

**३) सार्वभौम राज्यांचा उदय** : जुन्या राजनय काळाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे वसाहती करणाचा कालखंड होय. मात्र पहिल्या महायुध्दानंतर अनेक वसाहती राज्ये स्वतंत्र होवून सार्वभौम राज्यांचा उदय झाला. जुन्या राज्यांच्या मोडतोडीतून काही नविन राज्ये उदयास आली. पोलिश प्रदेश जर्मनीपासून वेगळा करून पोलीश प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. एकेकाळी हंगेरी आणि ऑस्ट्रीया हे एकच राज्य होते त्याचे दोन स्वतंत्र राज्ये बनली. झेकोस्लॉव्हिया या नवीन राज्याची निर्मिती झेक आणि स्लेव्हाक या दोन प्रदेशांना एकत्र करून करण्यात आली. अशी अनेक उदाहरणे या सदंर्भात देता येतील. परिणामी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या पटावर अनेक नविन चेहऱ्याची राष्ट्रे उदयास आली. ही सर्व राष्ट्रे संस्कृती, विचार आणि दृष्टीकोनाच्या बाबतीत विविधता बाळगणारे असल्याने जुन्या काळातील सरळ व साध्या राजनयिकांचे असलेले स्वरूप संपूर्ण बदलून गेले

**४) राज्यांचा समान दर्जा** : लोकशाही शासन पध्दतीची सर्वात महत्वाची आणि मुलभूत मागणी जर कोणती असेल तर ती समता होय. पहिल्या महायुध्दांनतर आंतरराष्ट्रीय व्यवहारात लोकशाही तत्वे लागू केल्याने त्यातून समतेचे तत्व पुढे आले. जगातील राष्ट्रांच्या आकाराचा , लेसंख्येचा, विविध साधन संपततीचा विचार न करता सर्व राष्ट्रांचा दर्जा हा समान मानला गेला. या पूर्वी समतेच्या तत्वांचा अवलंब आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जात नसे. जागतिक समस्या शक्ती सामर्थ्याच्या जोरावर सोडवण्याची पध्दती असल्याने बलशाली राष्ट्रांचा सर्वत्र दरारा होता. मात्र लोकशाही चा आंतरराष्ट्रीय व्यवहारात अवलंब सुरू झाल्यानंतर जागतिक प्रश्न सामर्थ्याच्या जोरावर नव्हे तर बहुमताच्या जोरावर सोडवण्याच्या नविन पध्दतीचा अवलंब सुरू झाला. जिथे बहुमाचा विचार होते तिथे मतदानाला महत्व प्राप्त होते आणि मतदान हे समतेच्या तत्वाची मागणी करते. परिणामी जगातिल सर्व राष्ट्रे कोणत्याच संदर्भात त्यांच्यात भेदभाव न करता समान मानली जावू लागली आणि एक राष्ट्र एक मत या समतेच्या तत्वाची उभारणी झाली. आंतरराष्ट्रीय समस्यांच्या संदर्भात जुन्या राजनयातील व्दिपक्षीय वाटाघाटी अणि गुप्त तडजोडी हे अर्थशून्य बनले आणि बहुपक्षीय निर्णय प्रक्रियेला चालना मिळाली.

**५) विकसित दळणवळणाची साधने** : दळण वळणाची साधने जुन्या राजनयाच्या काळात अतिशय बाळबोध वळनाची होती. म्हणून राजनयिकांना वाटाघाटीसाठी द्रुतगतीने अन्य देशात उपस्थित राहाणे शक्य नव्हते. तेव्हा वेळ प्रसंगी ताबडतोब वाटाघाटी करण्यासाठी आवश्यक ते अधिकार देवून राजनयिक अधिकाऱ्यांना परदेशात कायम स्वरूपी ठेवण्याची पध्दत जुन्या काळी होती. शिवाय फोन, तार, विनतारायंत्रे, सुक्ष्म ध्वनी लहरी मनोरे, हॉटलॉईन, टेलेक्स, फॅक्स, या सारखी प्रगत संसूचनाची साधने जुन्या काळी नसल्याने परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य राजनयिकांना होते. मात्र पहिल्या महायुध्दानंतर जागतिक पातळीवर दळणवळणाची साधने आणी संसूचनेची साधने झपाटयाने विकसित झाल्याने राजकीय मुत्सद्यांना तात्काळ परदेशात जावून विविध समस्यांच्या संदर्भात तेथील राजकीय नेत्यांशी, अधिकाऱ्याशी चर्चा करणे सुलभ झाले आहे. या साधंनाचा वापर करून बसल्या जागी वाटेल

त्या देशातून वाटेल ती कागद पत्रे मागवता येतात. संपर्क साधता येतो. फोन वरून बोलता येतो, ईंटरनेट मुळे अमोरा समोर समक्ष एकमेकांशी संवाद साधता येतो. आवश्यक त्या सूचना देता येतात. परिणामी जातीने एखाद्या देशात कायमचे वास्तव करून परिस्थितीनुरूप राजनय करण्याची गरज नव्या काळात राहिलेली नाही. म्हणून जुन्या काळात राजनयिकाना जे स्वातंत्र्य आणि महत्व होते ते बरेच कमी झाले आहे.

**६) विचार प्रणालींचा उदय** : पहिले महायुध्द चालू असतानाच म्हणजे १९१७ मध्ये रशियात क्रांती होवून साम्यवादी विचार सरणीवर आधारित साम्यवादी शासन प्रणालीचा उदय झाला. आणि अत्याल्प काळात रशियाने महाशक्तीच्या स्वरूपात आपले स्थान जागतिक पातळीवर निर्माण केले. जुन्या काळी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या आणि विरोधाच्या दिशा हे परिस्थिती सापेक्ष ठरवली जात असत. मात्र जागतिक पातळीवर विविध विचार प्रवाहांच्या उदयाबरोबर जागतिक पातळीवरील सहकार्य वा विरोध विचारसरणी नुसार निर्धारित नव्हे तर पूर्वनिर्धारित होवू लागल्या. परिस्थिती नुसार राजनय हा जुन्या काळातील राजनयाच्या आत्मा होता. मात्र नव्या काळात राजनय हे पूर्व निर्धारित बनल्याने त्याचे महत्व आणि राजनयिक अधिकाऱ्यांचे स्वातंत्र्य या दोन्हीचे महव कमी झाले कारण समान विचार सरणीच्या राष्ट्रांनी आपले हितसंबंध पूर्व निर्धारीत तत्वांप्रमाणे सांभाळू लागले. परिणामी जुन्या राजनयाचा अंत होवून नव्या राजनयाच्या काळाला आरंभ झाला.

**७) गटपध्दतीचा उदय** : जुना राजनय मागे पडण्यी आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात पहिल्या महायुध्दानंतर गटपध्दतीचा झालेला उदय, नाटो संघटना वॉर्सा करार संघटना अशा प्रकारच्या विविध संघटना एक गट नात्याने कार्य करू लागले. निर्णय सामुहिक रीत्याघेवू लागले. घेतलेले निर्णय सदस्य राष्ट्रावंर बंधन कारक करू लागले. अशा गटातील सामविष्ठ राष्ट्रांनी एक प्रकारची युती किंवा आघाडीच निर्माण केली आणि त्यातून आवाडीच्या, गटाच्या , किंवा युतीच्या एका नव्या राजनयाची निर्मिती झाली आणि जुना राजनय मागे पडला.

**८) सामुदायिकहिताचा विचार** : जुन्या काळातील राजनयाचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सत्ताधाऱ्यांच्या हिताचाच फारफारतर राष्ट्रहिताचाच विचार करणे होते. मात्र पहिल्या महायुध्दानंतर सत्ताधाऱ्यांच्या किंवा राजघराण्यांच्या हितापेक्षा अनेक राष्ट्रांच्या सामुदायिक हिताचा विचार पुढे येऊ लागला. परिणामी जुन्या राजनयाचे स्वरूपच बदलून गेले. ग्लॅडस्टनने युरोपियन समूह ही कल्पना जी मांडली त्यातून जागतिक समाजाचा विचार रूजू झाला. राजनयज्ञ देखील वैयक्तीक किंवा मुक्त राष्ट्रहिताच्या विचाराच्या जागी आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून विचार करू लागले. परिणामी जुने राजनय मागे पडून नव्या राजनयाचा उदय झाला.

## नवा राजनय :

पहिल्या महायुध्दानंतरच्या कालखंडातील राजनय म्हणजे नवा राजनयाचा कालखंड होय. पहिल्या महायुध्दानंतर बदलेल्या परिस्थितीत जुन्या राजनयाचे महत्व कमी झाले मात्र कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आंतरराष्ट्रीय समस्यांच्या उकलासाठी राजनय आवश्यक होते. जगात जो पर्यंत स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र राज्यानी युक्त अशी बहुराज्य पध्दती अस्तित्वात आहे तो पर्यत जगात युध्दाची शक्यता नाकारता येत नाही. युध्द टाळण्याचे एक प्रभावी साधन म्हणून राजनयाची गरज ही मान्य

करावीच लागणार. म्हणून पहिल्या महायुध्दांनतर राजनयाची गरज संपुष्टात आली नाही तर त्याच्या स्वरूपात परिवर्तन झाले. अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांना नव्या राजनयाचे उद्‌गाते मानले जाते. कारण पहिल्या महायुध्दाच्या काळात त्यांनी आपली चौदा कलमी योजना जाहिर करून राष्ट्रांनी आपसात गुप्त प्रकारचे तह आणि करार किंवा वाटाघाटी करू नयेत असा विनंती वजा प्रस्ताव मांडला. आणि इथूनच नवा राजनयाच्या काळाला आंरभ झाला. १९१९ पर्यंत काही थोडे अपवाद वगळता आशिया खंडातील बहुतेक देश युरोपातील बडया राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली होत्या. त्यामुळे राजकीय दृष्टया त्यांचे स्वतंत्र अस्तित्व नव्हते. राजनयिक प्रक्रियेत त्यांचा कोणताच सहभाग नव्हता. मात्र पहिल्या महायुध्दानंतर ही राष्ट्रे स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील बनली. दुसऱ्या महायुध्दापर्यंत अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. राजनय प्रक्रियेत स्वतंत्रपणे भाग घेऊ लागली. त्या पैकी कित्येत राष्ट्रांनी राष्ट्रसंघाचे सदस्यतव स्वीकारून जागतिक राजकारणात महत्वाची भूमिका बजावू लागली. युरोप आणि आशियायी राजकारणापासून अलिप्त राहणारा अमेरिका देखील आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेवू लागला. रशियाचाही महाशक्तीच्या स्वरूपात याच काळात पदार्पण झाले. पुढे रशियाच्या नेतृत्वाखाली साम्यवादी गट आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवलशाही लोकशाही गट अशा दोन गटात जगाची विभागणी झाली. पुढे साम्यवादी चीनच्या उदयानंतर साम्यवादी राष्ट्रगटाचे नेतृत्व कोणी करायचे यातून चीन, रशियात मतभेद वाढले. अशा सर्व पातळीवर जगातील बदलत्या परिस्थितीमुळे जुन्या राजनयाची जागा नव्या राजनयाने घेतली. शिवाय साम्राज्यवादाची स्पर्धा, व्यापारी हितसंबंधात निर्माण झालेला तणाव द्रुतगतीची दळण वळणाची साधने, लोकतांत्रिक शासन पध्दतीचा उदय, जलद संपर्काची संसूचनाची साधने, या सर्व कारणांमुळे एके काळी युरोप पुरतेच मर्यादीत राहणारे राजनयाचे क्षेत्र विश्वव्यापी झाले. लोकशाही, संसंदीय सभागृहे, जनमत प्रचारांचा वाढता प्रभाव साऱ्यांचा परिणाम राजनयावर पडून त्याचे जुने स्वरूप हरवले व त्या जागी नवा राजनयचा उदय झाला. राजकारणातील व्यक्तिंच्या वैयक्तिक हितापेक्षा राजनयात राष्ट्राच्या हितास प्राधान्य देण्याची प्रवृत्ती बळावू लागली. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र या सारख्या जग व्यापी संघटनांनी संकुचित संघटनांच्या जागा घेतल्या आणि राजनय हे सुध्दा जगव्यापी बनले. गुप्त पध्दतीचे दिवस संपले आणि त्या जागा मुक्त प्रजातांत्रिक आणि सांसदिय राजनयाने घेतली. परराष्ट्रातील राजनयिक प्रतिनिधी हे आपल्या राष्ट्राचे राष्ट्रातील जनतेचेहि प्रतिनिधीत्व करू लागले. राष्ट्रीय हितसंबंधा बरोबरच आंतरराष्ट्रीय हितांचाही त्यामुळे विचार होवू लागला. राष्ट्रा राष्ट्रांच्या संबंधात आणि एकमेकांप्रती असलेल्या दृष्टीकोनात आमुलाग्र परिवर्तन होवू लागले.

## नव्या राजनयाची वैशिष्ट्ये :

नव्या राजनयाची कांहि खास वैशिष्ट्ये आहेत. या वैशिष्ट्यमुळे नव्या राजनयाचे जुन्या राजनयाहून असलेले वेगळेपण ताबडतोब लक्षात येते. नव्या राजनयाची वैशिष्ट्ये खालील प्रामणे सांगता येतील.

**१) उघड राजनय** : राजकीय व्यवहाराच्या बाबतीत जुन्या काळी संपूर्ण गुप्तता पाळली जाते असे. आंतरराष्ट्रीय निर्णय, तडजोडी, वाटाघाटी, कमालिचे गुप्त ठेवल्या जात असत. पहिल्या महायुध्दांनतर मुत्सदी आणि राजकीय विचारवंताची अशी खात्री पटली की जागतिक तणाव वाढविण्यास आणि प्रसंगी युध्दाला तोंड फुटण्यास राजनयातील गुप्तताच मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे. शिवाय

पहिल्या महायुध्दानंतर जागतिक परिवेशातच मुळात बदल झाला. राजेशाहीचे युग संपून लोकशाही युगाला आंरभ झाला. आणि लोकशाही बरोबर गुप्तेते ऐवजी उघडपणे आणि मोकळेपणावर अधिक भर दिला जावू लागला. त्यातून जुन्या राजनयिक व्यवहाराची गुप्तता संपुष्टात येवून नव्या उघड राजनयास आंरभ झाला. राजनयिक व्यवहाराची चर्चा कायदेमंडळातून, वृत्तपत्रातून त्याच बरोबर रेडिओ, दुरदर्शन, वरून प्रसारित होवू लागली. परिणामी नव्या राजनयाचे स्वरूप हे गुप्त न राहाता ते उघड बनले.

२) **कार्यक्षेत्राचा विस्तार** : नव्या राजनयाचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्याच्या कार्यक्षेत्राचा विस्तार मोठया प्रमाणात झाला. जुने राजनय हे केवळ युरोप पुरतेच मर्यादीत होते. पहिल्या महायुध्दानंतर राजनयाचे कार्यक्षेम जगव्यापी बनले. दळण वळणाच्या साधनातील झालेला प्रचंड विकास जगातील राष्ट्रांना परस्परांच्या जवळ आणले. बदलत्या काळातील गरजा भागविण्यासाठी प्रत्यके राष्ट्राला जगातील अन्य राष्ट्रांशी या ना त्या स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करणे गरजेचे झाले. जनमानसाच्या मागणी प्रमाणे नव्या राजयनाच्या कार्यचा खूप विस्तार झाला.

३) **प्रशिक्षित राजनयज्ञ** : प्रशिक्षित राजनयज्ञ हे नव्या राजनयाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्ये होय. पहिल्या महायुध्दानंतर जागतिक संबंधांचे स्वरूप कमालिचे गुंतागुंतीचे बनले, जुन्या काळातील सरळसोट स्वरूपाची जागा या गुंतागुंतीने घेतल्याने ते हाताळणारे राजनयज्ञ निपून असणे आवश्यक बनले. यातूनच राजनयज्ञाच्या प्रशिक्षणाची गरज निर्माण झाली. जुन्या काळातील राजनयज्ञ हे राजघराण्याशी संबंधीत व्यक्तितूनच घेतले जात असत. मात्र या बदलेल्या परिस्थितीत स्पर्धात्मक परीक्षेतून त्यांची निवड केली जाते. त्यांना जाणीवपूर्वक विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. तेव्हा आजचा राजनयज्ञ तज्ञ, अनुभवी, प्रशिक्षित, आणि आंतराष्ट्रीय राजकारणाची उत्तम माहिंतगार असतो.

४) **बिकट कार्य** : जुन्या काळातील राजनय तसे सुलभ कार्य होते. बलशाली राष्ट्रे दुबळया राष्ट्राच्या पारडयात आपले वजन टाकून आवश्यकत ते सत्ता संतुलन साधीत असत. मात्र ही परिस्थिती आधुनिक काळात पूर्णपणे बदलली. जागतिक पातळीवर सर्वत्र संघर्ष आणि मतभेदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. अंत्यत विनाशकारी शस्त्रास्त्रांचा शोध लागला. त्या हस्तगत करण्याची स्पर्धा जगभर सुरू आहे. युध्द केव्हा कसे कोणत्या कारणासाठी उद्‌भवेल याचा नेम नाही. शिवाय एकदा सुरू झालेली युध्दे किती काळ चालतील याची खात्री नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध गट ताठर बनले असून विविध विषयावर तडजोडी पेक्षाही ताठर भूमिकेवर भर देत आहेत. नको ते प्रश्न प्रतिष्ठेचे बनवत आहेत. या सर्व परिस्थितीत राजनयिकाचे काम अतिशय बिकट आहे. तेव्हा बिकट कार्य हे नव्या राजनयाज्ञाचे एक वैशिष्ट्ये बनले आहे.

५) **कार्यातील बहुविधता** :पहिल्या महायुध्दापूर्वी राजनयज्ञाचे कार्य अतिशय मर्यादीत होते. युध्द उद्‌भण्याची शक्यता शोधणे, उद्‌भवलेले युध्द संपुष्टात आणणे, शांततेची निर्मिती करणे, एवढेच कार्य राजनयज्ञाचे होते. मात्र नव्या परिस्थितीत राजनयज्ञाचे कार्य खूपच वाढले आहे. केवळ राजकीय स्वरूपाचे नव्हे तर या बदलेल्या काळात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणीक या सर्वच क्षेत्राशी संबंधीत पैलूंचा विचार करून त्या संदर्भात आपले राष्ट्रहित साधण्याचे कार्य राजनयातून राजनयज्ञाला करावे लागते. त्याचे कार्य आता बहुविध झालेले आहे. तेव्हा कार्यातील बहुविधता सुध्दा नव्या

राजनयाचे एक वैशिष्ट्ये म्हणून उल्लेख करावा लागतो.

६) **मर्यादीत प्रतिष्ठा** : आधुनिक काळातील राजनयाचे आणखी एक वैशिष्टे म्हणजे जुन्या काळात राजनयज्ञाला ज्या प्रमाणात राजनयाच्या क्षेत्रात प्रतिष्ठा किंवा वजन होते ते आज राहिलेले नाही. वाटाघाटी, तडजोडी, या क्षेत्रात, राजदूतांना महत्वाची भूमिका पार पाडावी लागत असे. राज्यकर्ते या संदर्भात संपूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून असत. परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याचे स्वांतत्र्य त्याना होते. विनाविलंब निर्णयाच्या वेळी त्यांच्या सद्सद विवेकबुध्दी नुसार राष्ट्राच्या वतीने भूमिका घेण्याची मुबा होती. राजनयाच्या क्षेत्रात राजदूताची प्रतिष्ठा आणि वजन नजरेत भरण्यासारखे होते. मात्र आधुनिक काळात ही परिस्थिती संपुष्टात आली. दळण वळण व संसूचनाच्या साधनात आज जी प्रगती झाली आहे त्याचा वापर करून राज्यकर्ते आपल्या परदेश राजदूतांना प्रत्येक प्रसंगी सूचना व मार्गदर्शन करतात. राजदूतांच्या निर्णय स्वातंत्र्यवर बंधने निर्माण झाली. अलिकडे तर राजनयाची बहुतेक कार्य देशातील परराष्ट्र मंत्री, राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान हेच पार पाडतात. आंतरराष्ट्रीय परिषदा व संमेलनातून राजदूतांच्या जागी तेच वावरत असतात. यामुळे राजनयज्ञाचे याक्षेत्रातील निर्णय स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बऱ्याच मर्यादा आल्याने त्यांची प्रतिष्ठा घसरत चालल्याचे जाणवते.

## नवा राजनयाचे प्रकार :

वर्तमान काळात विविध राष्ट्रातील शासनाचे स्वरूप त्या राज्याने अंगीकारलेल्या विचारसरणीशी संबंधीत असते. जगामध्ये आज विविध विचारसरणीवर आधारित शासन व्यवस्था आहेत. उदा. साम्यवाद, लोकशाही, भांडवलशाही, समाजवाद, हुकूमशाही वगैरे. मात्र जागतिक राजकारणात या सर्वच राष्ट्रांना या ना त्या कारणासाठी परस्पराशी संबंध ठेवावेच लागतात. हे संबंध प्रस्थापित करताना विविध पध्दतीना, नियमाना प्राधान्य दिले जाते. पहिल्या महायुध्दानंतर जुन्या राजनयाची जागा नव्या प्रकारच्या राजनयाने घेतली. या नव्या राजनयाचे विविध प्रकारही निर्माण झाले उदा. लोकतांत्रिक, सर्वकष, खुले, परिषेदद्वारा, संसदीय, वगैरे. या प्रकारचे संक्षिप्त वर्णन पुढील प्रमाणे करता येईल.

१) **लोकतांत्रिक राजनय :** विसाव्या शतकापासून लोकतांत्रिक राजनयाची संकल्पना वापरात येवू लागली. जुन्या काळी स्वेच्छाचारी राजतांत्रिक शासनामध्ये राजा आपल्या मर्जीप्रमाणे अन्य देशांशी संबंध प्रस्थापित करीत असे. मात्र लोकतांत्रिक शासनाच्या विकासाबरोबर शासनाची सूत्रे जनप्रतिनिधींच्या हाती सोपवली गेली. जनप्रतिनिधी आपल्या प्रत्येक कृत्या बद्दल जनतेला जबाबदार राहू लागले. जगातील कोणत्या देशाशी आपल्या देशाचे काय संबंध असावेत या बाबत शासन कर्त्याच्या स्वइच्छेपेक्षा जनेतेची इच्छा जास्त महत्वाची ठरू लागली. राजनयाचे दरबारी आणि संरजामशाही स्वरूप संपुष्टात आले. लोकतांत्रिक राजनयामध्ये लोकमताचा प्रभाव वाढला. राजनयाबद्दल जनतेमध्ये चर्चा होवू लागली. जनता राजनय बद्दल आपली मते व्यक्त करून लागली. नव्या पध्दतीप्रमाणे राजनयाची प्रक्रिया म्हणजे एका देशातील जनतेशी आपल्या प्रतिनिधीमार्फत औपचारिक व अनौपचाररिक मार्गाने संपर्क ठेवण्याची प्रक्रिया बनली. अशा परिस्थितीत राजनयज्ञांना शासन कर्त्यांच्या आज्ञा बरोबरच जनभावनांचीही कदर करावी लागते. ज्या प्रमाणे देशांतर्गत प्रश्न लोकतांत्रिक पध्दतीने सोडविले जाऊ शकतात त्याच प्रमाणे आंतरराष्ट्रीय समस्याची सोडवणूक केली जाऊ शकते. ही लोकतांत्रिक राजनय मार्गाची प्रमुख भूमिका आहे. शांतापूर्ण मार्गाचा अवलंब करून जागतिक प्रश्नांची सोडवणुक हा या राजनयातील महत्वपूर्ण भाग आहे. या प्रकारात गुप्त राजनयाला अजिबात स्थान नाही. या राजनयाच्या प्रक्रियेमध्ये सहाय्यभूत होण्यासाठी सक्षम, कुशल, आणि प्रशिक्षित असा अधिकारी वर्ग नेमला जातो. हा पगारी नौकरवर्ग संपूर्णतः व्यावसायिक आणि राजकीय दृष्टया तटस्थ असतो. त्यामुळे या प्रकारातील हे राजनय हे राजकीय दृष्टया आधिक तटस्थ बनते. लोकतांत्रिक राजनयामध्ये इतर देशांशी केलेले करार, तह पवित्र मानले जाऊन त्यांच्या पालनाप्राती ही राष्ट्रे वचनबध्द असतात. प्रतिपक्षाप्रती सुडाची भावना न बाळगता परस्पर चर्चा व वाटाघाटी द्वारे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. लोकतांत्रिक राजनयाचा पुरस्कार करणारी राष्ट्रे आर्थिक, राजकीय व लष्करी मदतीची प्रलोभने दाखवून त्या राष्ट्रांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न करतात. इतर राष्ट्रांच्या राजनयज्ञबरोबर नम्रतापूर्वक भाषेचा प्रयोग केला जातो आणि शिष्टाचाराचे पालन केले जाते. यातून विविध देशातील राष्ट्रप्रमुखांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात. त्यामुळे दोन्ही राष्ट्रातील संबंध सोहार्द पूर्ण बनतात.

**२) सर्वकषवादी राजनय** : पहिल्या महायुध्दानंतर जसा लोकतांत्रिक शासन पध्दतीचा उदय झाला त्याच प्रमाणे जर्मनी इटली आणि जपान सारख्या देशामध्ये सर्वकषवादी राजवटीही उदयास आल्या. हिटलर, मुसोलिनी साख्या हुकूमशहानी आंतरराष्ट्रीय संबंधा मध्ये नव्या समस्या निर्माण केल्या. सत्ता बलशाली करण्यासाठी अन्यराष्ट्रावर आपली पकड मजबूत करण्यासाठी विविध अलोक तांत्रिक मार्गांचा'ते अवलंब करू लागले. विस्तारवाद आणि हेरगीरी साठी राजनयाचा वापर त्यांनी आंतरराष्ट्रीय संबंधात सुरू केले. या राजवटीनी राजनयाची भाषा आणि पध्दती यांना हिणकस स्वरूप दिले. या शासनात सत्ता संपूर्णपणे एकाव्यक्तिच्या हाती असल्याने लोकांना विश्वासात न घेता राजनयिक पातळीवरील सर्व निर्णय ते एकटेच घेतात. जो पर्यंत त्यांच्या हितांचे आहे तोपर्यंत आंतरराष्ट्रीय कायद्यांना सर्वकष राजनय मानतो त्यांनतर त्या कायद्यांना मानन्याची त्यांना गरज वाटत नाही. आपल्या हितसंबंधाच्या विरोधी जाणाऱ्या सर्वच बाबी आंतरराष्ट्रीय कायदे, करार, तह यांना सर्वकष राजनयीक मान्य करीत नाहीत. हेरगिरी, घातपात, युध्द, राज्याचा विस्तार या सर्व लक्षणांनी हे सर्वकषवादी राजनयज्ञ युक्त असतात. त्यांच्या राजयनयात विश्वासाचा भाग अभावानेच आढळतो. भांडवलशाही सर्वकंषकारी राजनय हा लोकशाही पध्दतीवर विश्वास न ठेवणारा, पूर्णपणे कुटील व्यवहारावर आधारलेला, बेजबाबदार आणि अविश्वसनीय स्वरूपाचा मानला जातो.

**३) प्रकट राजनय** : जुन्या राजनयाच्या काळात गुप्त राजनयाची पध्दत होती. त्यामुळे सर्वत्र साशंक, भिती, असंतोष अशा प्रकारचे वातारण आंतरराष्ट्रीय पातळीवर होते. मात्र पहिल्या महायुध्दानंतर प्रकट राजनयाची कल्पना मांडण्यात येवू लागली. या संदर्भातील पहिले पाऊल म्हणजे पहिल्या महायुध्दानंतर पॅरिस शांतता परिषेदच्या वेळी अमेरिकेचे तत्कालिन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी प्रकटपणे चौदा सूत्री कार्यक्रम मांडले. राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्राच्या सनदेमध्ये प्रकट राजनयाच्या तत्वाला मान्याताही देण्यात आली. प्रकट राजनय म्हणजे राष्ट्रात ज्या वाटा घाटी चर्चा करार, तह होतात त्यांना गुप्त न ठेवता पूर्णपणे प्रसिध्दी देणे. यामुळे त्या राजनयिक व्यवहराबद्दल दोन्ही राष्ट्रांमध्ये कोणतीही शंका राहात नाही. जनतेला त्या संबंधी सर्व माहिती मिळाल्याने त्या संबंधीची आपली मते व भावना जनता देखील उघडपणे मांडू लागते. मात्र अलिकडील गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय संबंधाप्रती राजनयाचा वापर करीत असताना सर्वच बाबतीत प्रकट राजनय हे गैर सोयीचे ठरत आहे.

**४) व्यक्तिगत किंवा शिखर राजनय** : दोन किंवा त्यापेक्षा जास्त राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री, पंतप्रधान, किंवा प्रमुख यांनीच प्रत्यक्षात पुढाकार घेऊन व्यक्तिशः जेव्हा राजनैतिक वाटाघाटी करतात त्याला व्यक्तिगत किंवा शिखर राजनय असे म्हणतात. राजनयाच्या या प्रकारात प्रत्यक्ष भेट व परस्परामध्ये वाटाघाटी यांना अतिशय महत्व असते. या प्रकारच्या राजनयाला आधुनिक काळात अतिशय महत्व प्राप्त झालेले आहे. शिखर राजनयाचा उदय केवळ आधुनिक काळातच झालेला नसून प्राचीन काळात देखील या पध्दतीचा अवलंब केला जाते. मात्र आधुनिक काळात या मार्गाचा अवलंब अधिक प्रमाणात केला जातो. उदा. दुसऱ्या महायुध्दानंतर चर्चिल आणि रूझवेल्ट यांनी १९४१ मध्ये घेतलेली अटलांटिक परिषद. १९४३ मध्ये चर्चिल, रूझवेल्ट आणि स्टॅलिन यांनी घेतलेली तेहरान परिषद. १९४५ मध्ये चर्चिल, स्टॅलिन आणि ट्रूमन यांनी घेतलेली पोस्टडॅम परिषद. १९५४ मधील इंग्लंड, अमेरिका व रशियातील बर्लीन परिषद, १९७२ मधील भारत-पाक सिमला परिषद. १९७३ मधील निक्सन-ब्रेझनेव्ह वॉशिंटन शिखर परिषद, १९८५ मधील रेगन-गोर्बाचेव्ह जिनेव्हा परिषद

यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येइल. या परिषदातील निर्णयाचे युध्दावर आणि युध्दोत्तर जगावर अतिशय महत्वाचे परिणाम घडून आले. या शिवाय वेळो वेळी अशा परिषदा विविध बडया व छोटया राज्यात सतत घेतल्या गेल्या. आंतरराष्ट्रीय संबंध सुधारण्याच्या दृष्टीने या राजनयाचे योगदान फार मोठे मानले जाते. शिखर परिषदांचे आयोजन ही एक नाजूक बाब समजली जाते. अशा परिषदांकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले असते. या परिषदा जर अपयशी होण्यासाठी ठरल्या तर जगात निराशेची लाट परसते. अशा परिषदा यशस्वी निश्चित निर्णय घेण्याच्या निर्धाराने ती आयोजीत करावी लागतात. यात सहभागी होणाऱ्या संबाधितांना समस्या सोडविण्याची मनापासून इच्छा आणि जिद्द असावी लागते. शिखर परिषेदेचा आणखी एक प्रकार म्हणजे दोन राष्ट्र प्रमुखांनी तिसऱ्याच एखाद्या देशात त्या देशाच्या मध्यस्थीने वाटाघाटी करणे होय. १९६६ साली रशियाच्या मध्यस्थिने रशियातील ताश्कंद येथे भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान यांची ताश्कंद शिखर परिषद भरली होती. इजिप्त चे अध्यक्ष सादात आणि इस्त्राईलचे पंतप्रधान बोर्गन यांच्यातील अमेरिकेच्या मध्यस्थीने १९७८ साली झालेली शिखर परिषद. विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात अशा शिखर परिषदेतील राजनयाला विशेष महत्व दिले जात आहे.

**५) संसदीय राजनयन** : अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री डीनरस्क यांनी सांसदीय राजनय या शब्दाचा प्रयोग पहिल्यांदा संयुक्त राष्ट्र संघाच्या राजनय पध्दतीला संबोधून केले आहे. संसदीय कार्य पध्दतीशी बऱ्याच प्रमाणात जुळणारी कार्यपध्दती ही संयुक्त राष्ट्र संघाची आहे. राज्यातील संसदेत ज्या प्रमाणे विविध गटाचे व पक्षांचे प्रतिनिधी चर्चा व वादविदात भाग घेतात त्याच प्रमाणे संयुक्त राष्ट्रातील बैठकीचे स्वरूपही असते. विविध राजकीय पक्ष किंवा गट संसदेत आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात, अगदी त्याच प्रमाणे संयुक्त राष्ट्र संघातील संदस्य गटही आपापल्या हितसंबंधानुसार प्रयत्नशील असतात. एखाद्या राज्यातील संसदेतील कामकाजा प्रमाणे संयुक्त राष्ट्रातही हे कार्य घडत असल्याने त्याला सांसदीय राजनय असे संबोधले जाते.

**६) परिषदाद्वारे राजनय** : दुतावास हे राजनयिक संबंध प्रस्थपित करण्याचे मुख्य स्थान होय. मात्र आधुनिक काळात या व्यतिरिक्त मार्गाच अवलंब राजनयासाठी केला जातो. तो म्हणजे अधिवेशनाद्वारे किंवा परिषदांद्वारे होणारे राजनय. हा प्रकार प्राचीन काळात देखील अस्तित्वात होता. मात्र १८१५ च्या व्हिएन्ना परिषदे नंतर या पध्दतीचा अवलंब जास्त प्रमाणात प्रचलित झाला. आधुनिक काळात विविध राष्ट्रे एकत्र येऊन विविध समस्यांवर विचार विनिमय करून काही निर्णय घेतात यालाचा परिषद राजनय किंवा बहुपक्षीय राजनय असे म्हणतात. एक किंवा दोन राष्ट्रांच्या पुढाकाराने किंवा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मार्गदर्शनाखाली अशा आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले जाते, व त्यातून राजनयाची प्रक्रिया घडते. मुळात राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती अशा बहुपक्ष संमेलनातूनच झालेली आहे. जागतिक पातळीवर आज प्रचंड प्रमाणात अशा परिषदांचे आयोजन करून राजनयिक प्रक्रिया पूर्ण केली जाते. सर्व साधारणपणे वर्षातून सरासरी सहा हजार दहा हजाराच आसपास अशा परिषदांची आधिवेशने भरतात. एकटया संयुक्त राष्ट्र संघाद्वारे सुमारे पाच हजार परिषदा दरवर्षी बोलावल्या जातात. एकंदरीत परिपर्दाय राजनय ही आजच्या काळाची गरज आहे. दिवसें दिवस तिची लोकप्रियता वाढत आहे. लॉर्ड हॅकि यांच्या मते, परिषदीय राजनय पध्दती ही जगातील युध्द प्रवृत्तीवर प्रतिबंध घालणारी उत्तम पध्दती होय. अशा परिषेदेतील लवचिक कार्य

पध्दती, कमी संख्या, अनौपचारीकता, परस्परसंबंध व शक्य झाल्यास प्रमुख प्रतिनिर्धीचे आपसातील व्यक्तिगत मैत्रीचे संबंध, चर्चेतील गोपनीयता व निर्णया बाबतची प्रसिध्दी, विश्वासपात्र सचिव वे दुभाषिक इ. महत्वपूर्ण लक्षणे असल्यास परिषदीय राजनय पध्दती निश्चित यशस्वी होवू शकते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात मित्र राष्टांनी सल्ला मसलती साठी आणि महत्वाचे निर्णय घेण्यासाठी अनेक वेळा परिषद राजनय पध्दतीचा अवलंब केला होता. यातील लवचिकता व अनौपचारीकता या गुणामुळे हा प्रकार अधिक लोकप्रिय होत आहे.

नव्या राजनयाचे हे जे विविध प्रकार आपण पाहिले आहेत त्या पैकी कोणताही प्रकार हा संपूर्णपणे दोषमुक्त नाही. सर्वच प्रकारात गुणांबरोबर कमी अधिक प्रमाणात दोष हे आहेतच. तरी पंरतु देश, काल परिस्थितीनुरूप विविध राष्ट्रे या प्रकारच्या राजनयाचे अवलंब करतात. प्रत्यक्षात राजनयाची प्रक्रिया कोणत्याही एकाच पध्दतीने होत नाही. लोकतांत्रिक, परिषदेद्वारे, शिखर परिषदे द्वारे, वगैरे सर्व प्रकार परस्परात गुंफलेले असातात आणि राजनयाची प्रक्रिया विविध पातळीवर चाललेली असते. राष्ट्रप्रमुखांची शिखर परिषद जेव्हा भरते त्यापूर्वी दुय्यम अधिकारी आणि तज्ञ यांच्या बैठका होवून तपशीलवार चर्चेच्या फेरी या झडलेल्याच असतात. अशा परिषदामधून राष्ट्रातील राजकीय श्रेष्ठीजन त्यांचा अंतीम निर्णय जाहीर करीत असतात. राजनयाचा प्रकार कोणता का असेना त्या मध्ये राष्ट्रराष्ट्रातील देवाण घेवाण, वाटाघाटी, ही क्रिया महत्वाची असते.